cmyk

## संपादकीय

### सरकारवर खुलासे करण्याची केवीलवाणी वेळ

अगोदरच देशाचे ग्रोथ इंजिन असणाऱ्या महाराष्ट्राचे महत्त्व कमी करण्यासाठी अनेक प्रकल्पांच्या झालेल्या पळवापळवीवरून तीव्र असंतोष व्यक्त होत असताना त्यात अर्थसंकल्पातही महाराष्ट्रासोबत झालेल्या सापत्न वागणुकीची भरच पडली आहे. त्यावर संतापाची लाट निर्माण होणे हे साहजिकच. येत्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला या संतापाच्या लाटेचा सामना करावाच लागेल अशी परिस्थिती आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### शेतकऱ्याकडून लाच घेणाऱ्या दोघांना पकडले

गेवराई-रेशिम उद्योग अंतर्गत तुती लागवडीची रोहयोअंतर्गत फाईल करण्यासाठी एका शेतकऱ्याकडून दोन हजाराची लाच घेताना गेवराई पंचायत समितीच्या तांत्रिक सहाय्यकाच्या खासगी इसमाला रंगेहाथ पकडले. ही कारवाई शुक्रवारी दुपारी एसीबीच्या पथकाने केली. यात लाचखोर तांत्रिक सहाय्यक संदिप रोहिदास राठोड (वय-३४, पंचायत समिती, गेवराई) आणि खासगी एजंट चंद्रकांत धर्मराज शेळके (वय-२५, व्यवसाय फिटर, पंचाळेश्वर, ता. गेवराई) यांना पकडले असून तक्रारदार याच्याकडे १० हजाराची मागणी केली होती. ही कारवाई उपाधिक्षक संगिता पाटील, पोलिस हवालदार सुनिल पाटील, विलास चव्हाण, सी.एन. बागुल यांनी केली.


बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–९६ | शनिवार दि.२७ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


# जीआर निघाला; शेतकऱ्यांना आता कृषीपंपासाठी वीज मोफत

## दिलासा: ४४ लाख बळीराजाला मिळणार लाभ, मार्च २०२९ पर्यंत योजना

**मुंबई । प्रतिनिधी**

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने लोकप्रिय घोषणांची खिरापत सुरुच ठेवताना आता 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४ लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारकडून जीआर काढण्यात आला आहे. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी २५ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४' अंमलात आली आहे.**

महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना रात्रीच्या वेळी १०/८ तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज वीजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने करण्यात येते. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीज बिलाचा भार उचलण्यासाठी शासनाने राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णतः मोफत वीज पुरवली जाणार आहे. यासाठी साधारण १४ हजार ७६० कोटी रुपये अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वीज बिल माफ केल्यानंतर या वीजदर सवलती पोटी रक्कम शासनाकडून महावितरण कंपनीला अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यात येईल. सध्या देण्यात येणारी वीजदर सवलत रुपये ६ हजार ९८५ कोटी अधिक वीज बिल माफीनुसार सवलत रुपये ७ हजार ७७५ कोटी असे वार्षिक वीजदर सवलती पोटी प्रतिवर्षी रु. १४ हजार ७६० कोटी शासनाकडून महावितरण कंपनीला

पान २ वर

### या योजनेचा कालावधी किती आहे?

ही योजना पाच वर्षांसाठी म्हणजेच एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. परंतु ३ वर्षांच्या कालावधीनंतर या योजनेचा आढावा घेऊन पुढील कालावधीत योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

### महायुतीच्या आमदारपुत्राचे आघाडीप्रेम

परभणी-पक्षाने आम्हाला उमेदवारी दिली तर आम्ही स्वगृही परतण्यास तयार आहोत. उद्या जर आम्हाला उमेदवारी नाही भेटली तर आमची अपक्ष लढवण्याची तयारी आहे, पण महायुतीतून निवडणूक लढणार नाहीत. हे आमचं स्पष्ट आहे, असे अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार बाबाजानी दुर्रानी यांचे पुत्र जुनेद दुर्रानी यांनी म्हटले आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी गुरुवारी (दि.२५) बाबाजानी दुर्रानी यांच्या घरी भेट दिली होती. त्यानंतर जुनेद दुर्रानी यांनी हे वक्तव्य केले आहे.



### कोणते शेतकरी लाभार्थी असतील?

राज्यातील ७.५ अश्वशक्ती पर्यंत शेतीपंपाचा मंजूर भार असलेले सर्व शेतीपंप ग्राहक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील.

### योजनेची अंमलबजावणी केव्हापासून होणार?

एप्रिल २०२४ पासून ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या शेतीपंप ग्राहकांना मोफत वीज मिळणार आहे. तर मार्च २०२९ पर्यंत ही योजना सुरु राहणार आहे.



## जागा वाटपाबाबत काँग्रेसची १० सदस्यीय समिती

### महाविकास आघाडीतील घटक पक्षांसोबत चर्चा करणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील आगामी विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर जागा वाटपाच्या चर्चेला महाविकास आघाडीतील काँग्रेसकडून लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याचे संकेत काँग्रेसने दिले असून, महाविकास आघाडीतील घटक पक्षांशी जागावाटपाबाबत चर्चा करण्यासाठी काँग्रेस हायकमांडने १० सदस्यांची समिती स्थापन केली. त्यापैकी ३ सदस्य मुंबईतील जागावाटपाबाबत चर्चा करणार आहेत. या समितीचे नेतृत्व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले करणार आहेत. महाराष्ट्र विधानसभेच्या एकूण २८८ जागा काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात विभागल्या जाणार आहेत. जागावाटपाबाबत महाविकास आघाडीतील पक्षांची प्राथमिक स्तरावर बोलणी झाली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या आदेशानुसार

पान २ वर

## ढ शिक्षकांचे पगार अर्धे होणार, वेळ आल्यावर सेवेतून बडतर्फ

### शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांचा मोठा निर्णय; दर्जा सुधारण्यासाठी उचलले कठोर पाऊल

**पुणे । प्रतिनिधी**

**शिक्षणाचा दर्जा न सांभाळणाऱ्या शिक्षकांना आधी ६ महिने प्रशिक्षण दिले जाणार असून त्यातूनही दर्जा सुधारला नाही तर अशा शिक्षकांचा ५० टक्के पगार कापला जाणार आहे. तरीही दर्जा सुधारला नाही तर सेवेतून कमी करणार असल्याची मोठी घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी केली आहे. पुण्यात ते एका वृत्त वाहिनीच्या शिक्षण परिषदेत बोलत होते. त्यामुळे शिक्षकांचे धाबे दणाणले असून पालकवर्गातून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.**





यावेळी दिपक केसरकर म्हणाले, शिक्षक समाधानी असतील तरच ते विद्यार्थ्यांना गुणात्मक शिक्षण देऊ शकतील. पुढील काळात शिक्षण क्षेत्रातल्या सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण अधिकारी, डेप्युटी डायरेक्टर सर्वांना फिल्डवर उतरून दर्जात्मक शिक्षण द्यावं लागणार आहे. आठवीपर्यंत परीक्षा नाही यामुळे मुलं निर्धास्त राहतात.

पान २ वर

### जर्मनीशी मनुष्यबळ पुरवण्यासाठी करार

कोणत्याही पालकमंत्र्यांनी आपल्या सिस्टर सिटीचा उपयोग महाराष्ट्रासाठी झाला पाहिजे असा विचार केला नाही अशी खंत यावेळी त्यांनी व्यक्त केली. जर्मनीतील बाडेन-वुर्टेमबर्ग हे दुसरं सर्वात श्रीमंत राज्य आहे. त्यांना ५ लाख तरुणांची गरज असून, आम्ही ४ लाखांचं टार्गेट घेतलं. पहिल्या १० हजार मुलांना प्रशिक्षण दिलं जात आहे. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बदलणारा हा निर्णय आहे. साधा वायरमन जरी जर्मनीत गेला तर त्याला वर्षाला ३० लाख असेल, जो स्वप्नातही विचार करु शकत नाही. नर्सेसला वर्षाला ३६ लाख पगार मिळेल असे दीपक केसरकर यांनी सांगितले.

### असा राबवला जाणार गुणवत्ता कार्यक्रम

मी असेदेखील सर्क्युलर काढले आहे की, ज्या शिक्षकांना शिकवता येत नसेल त्यांना ६ महिने पूर्ण पगार देऊन प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतरही बदल झाला नाही तर ५० टक्के पगार कमी करणार आणि तरीही बदल झाला नाही तर सेवेतून दूर करणार असल्याचे ते म्हणाले.

## लाडक्या बहीणीचा ४६ हजार कोटींचा खर्च उचलायचा कसा?

### वित्त विभागाला तिजोरीची चिंता

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या अर्थसंकल्पात अजित पवार यांनी महायुतीची महत्वकांक्षी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. सद्या यावरून बरेच वादंग उठल्याचे दिसत आहेत. आता राज्याच्या वित्त विभागाने या योजनेवर चिंता व्यक्त केली आहे. महिला, मुलींसाठी आधीपासूनच योजना असताना या योजनेवर अजून कोट्यवधींचा खर्च कशाला असा त्यांचा रोकडा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. दरवर्षी ४६ हजार कोटींचा खर्च उचलायचा कसा? याची चिंता राज्याच्या वित्त विभागाला लागली आहे.**

या योजनेची राज्यातील महिला वर्गाला मोठी उत्सुकता आहे. अनेक अडथळे, शर्यत पार करत या योजनेसाठी अर्ज भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे. प्रत्येक जिल्ह्यातील आकडेवारी समोर येत आहे. या योजनेला महायुतीने विधानसभेसाठी

पान २ वर

## सरकारने आरक्षणाचा प्रश्न सोडवावा –खा.रजनीताई पाटील

**केज । प्रतिनिधी**



**काँग्रेसचा खासदार ज्येष्ठ नेत्या,राज्यसभेच्या खा रजनीताई अशोकराव पाटील संसदपटू म्हणून राज्यसभेत प्रश्न मांडत असतात. मराठा आरक्षण, मुस्लिम आरक्षण धनगर आरक्षण प्रश्नावर सरकारने तात्काळ तोडगा काढावा,समाजाला न्याय द्यावा ही मागणी आक्रमक होऊन मांडली.**

संसदेत मराठमोळा आवाज बुलंद झाला. मागणीसाठी सर्व समाज आंदोलन,उपोषण करत आहेत त्याकडे दुर्लक्ष करू नये हे सांगून सरकारला या प्रश्नावर निरुत्तर केले. खा. पाटील यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारला धारेवर धरले. सरकारला धारेवर धरणाऱ्या काँग्रेसच्या प्रभावी महिला

पान २ वर

## परळी नगर परिषदेत आग प्रतिरोधक अत्याधुनिक यंत्रणांनी सज्ज २ दुचाकी दाखल

**परळी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागामार्फत बीड जिल्ह्यासातील नगरपालिकांच्या अग्निशमन विभागास फायर फायटींग बाईकचे नगर परिषदचे मुख्यधिकारी त्र्यंबक कांबळे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.**



परळी वैजनाथ नगर परिषदेसाठी आग प्रतिरोधक अत्याधुनिक यंत्रणांनासाठी २ दुचाकी सज्ज झाले आहेत. नगर परिषदचे मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे यांनी या दुचाकींचे लोकार्पण केले. अग्निशमन विभागास फायर फायटींग बाईक यंत्रासह सज्ज असलेल्या दुचाकीच्या

पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२५ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.५० क्विंटल | २,००० | ३,२१२ | २,५९८ |
| ज्वारी/हायब्रिड :२४.५० क्विंटल | २,१०० | २,४८० | २,२६९ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : १४.५० क्विंटल | १०,२०० | १०,३७२ | १०,२८६ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: १८.०० क्विंटल | २,४७० | ३,००० | २,६७० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ११८.०० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,३०० | ६,५५१ | ५,९२५ |

## दुध भेसळखोरांविरोधात कठोर कारवाईसाठी राज्याचा स्वतंत्र कायदा करणार–मुख्यमंत्री

### सुरेश धस यांच्या मागणीला यश; भेसळखोरांवर अजामीनपात्र गुन्ह्यासाठी केंद्राला शिफारस करणार

**आष्टी । प्रतिनिधी**

**दुध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी एमपीडीएपेक्षाही कठोर असा राज्याचा स्वतंत्र कायदा करावा लागेल. तसेच अन्न पदार्थातील भेसळखोरांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल व्हावा यासाठी सुरेश धस यांनी राज्य सरकारकडे पत्राद्वारे मागणी केली होती.यावर गुरुवारी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत दुध भेसळखोरांविरोधात कठोर कारवाईसाठी राज्याचा स्वतंत्र कायदा करणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देत यासाठी भेसळखोरांवर अजामीनपात्र गुन्ह्यासाठी केंद्राला शिफारस करणार असल्याची माहिती सुरेश धस यांनी दिली.**





राज्यातील दुधातील भेसळखोरांविरोधात अन्न व औषध प्रशासन आणि दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी संयुक्त मोहीम प्रभावीपणे राबवून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश ही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी व्ही. रमणी पॅटर्न राबविणे तसेच राज्यातील दुध व दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीविषयी आयोजित संयुक्त बैठकीत मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा अत्राम, माजी मंत्री सुरेश धस यांच्यासह मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. चहल, दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, अन्न व औषश प्रशासन विभागाचे सचिव दिनेश वाघमारे, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, तसेच केंद्रीय एफएसएसएआयचे अधिकारी आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले,अन्न पदार्थातील भेसळ

पान २ वर






cmyk

## अग्रलेख

# सरकारवर खुलासे करण्याची केवीलवाणी वेळ

अगोदरच देशाचे ग्रोथ इंजिन असणाऱ्या महाराष्ट्राचे महत्त्व कमी करण्यासाठी अनेक प्रकल्पांच्या झालेल्या पळवापळवीवरून तीव्र असंतोष व्यक्त होत असताना त्यात अर्थसंकल्पातही महाराष्ट्रासोबत झालेल्या सापत्न वागणुकीची भरच पडली आहे. त्यावर संतापाची लाट निर्माण होणे हे साहजिकच. येत्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला या संतापाच्या लाटेचा सामना करावाच लागेल अशी परिस्थिती आहे.

महाराष्ट्र व हरियाणा या भाजप सत्तेत असलेल्या राज्यांमधील विधानसभा निवडणुका तोंडावर आलेल्या असतानाही त्या राज्यांकडे साफ दुर्लक्ष करून भाजपने बिहार व आंध्रच्या झोळीत भरघोस दान टाकणे हे मोदी सरकारच्या आजवरच्या कार्यपद्धतीनुसार आक्रितच. नितीशकुमार व चंद्राबाबू नायडू यांनी मोदी सरकारला हे आक्रित घडवणे भाग पाडले. त्याचे तीव्र पडसाद उमटणे अत्यंत साहजिकच व तसे ते तात्काळ उमटलेही. अर्थसंकल्प सादर झाल्यावर महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या खासदारांनी सरकारने सापत्न वागणूक दिल्याचा दावा करत सरकारचा जोरदार निषेध केला. राज्यातील महायुतीच्या नेत्यांनी खिंड लढवण्याचा प्रयत्न केला खरा पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या चेहऱ्यावरची निराशा त्यांना काही लपविता आली नाही. नाही म्हणायला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात विविध योजना व तरतुदींतून महाराष्ट्राच्या वाट्याला बरेच काही आल्याचे आकडेवारीची गोळाबेरीज करून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, बिहार, आंध्रावर झालेल्या दौलतजादाच्या आकड्यांसमोर फडणवीसांच्या गोळाबेरीजवाल्या आकडेवारीची स्थिती 'बापुडी'च ठरली.

इंडिया आघाडीनेही मोदी सरकारच्या या आर्थिक सापत्न वागणुकीवरून संताप व्यक्त करत संसद दणाणून सोडली. त्याची 'धग' लक्षात आल्यावर सरकारला खुलासे करण्याची धावपळ करावी लागली. आपल्या दीड तासाच्या अर्थसंकल्पीय भाषणात महाराष्ट्राचे नावही न घेतल्याचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत स्वत:च मान्य केले. मात्र, महाराष्ट्रातील बंदरांच्या कामासाठी ७५ हजार कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केल्याचा दावा त्यांनी केला. भाषणात सर्व राज्यांची नावे घेणे शक्य नाही पण ती घेतली नाहीत म्हणून राज्यांना निधी दिला नाही, असे होत नाही, असे सांगत त्यांनी बाजू सावरून घेण्याचा प्रयत्न केला. अर्थातच हा प्रयत्न विरोधकांचे समाधान करू शकणारा नव्हताच. त्यामुळे अर्थसंकल्पातील सरकारच्या सापत्न वागणुकीचा मुद्दा या अधिवेशनात तर पेटता राहणारच पण ज्या राज्यांमध्ये लवकरच निवडणुका होऊ घातल्या आहेत त्या राज्यातील निवडणूक प्रचारात हा मुद्दा कळीचा ठरणार हे स्पष्टच आहे. सरकारच्या पहिल्याच अर्थसंकल्पात दोन राज्यांवर उघड-उघड मेहरबानीचा वा दौलतजादाचा प्रकार राजकीयदृष्ट्या अडचणीचा ठरू शकतो हे भाजपच्या चाणक्यांना कळत नाही असे समजण्याचे काहीच कारण नाही. मात्र, भाजपने हा धोका स्वीकारला आहे. त्याचा अर्थ स्पष्टच आणि तो म्हणजे राज्यांमध्ये भाजपची सत्ता येवो की न येवो पण केंद्रातील भाजपची सत्ता कुठल्याही परिस्थितीत टिकलीच पाहिजे आणि त्यासाठी नितीशकुमार व चंद्राबाबू नायडू यांना कायम खुश ठेवावेच लागेल, हे भाजपने व स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मान्य केले आहे. परिणामी देशाचा अर्थसंकल्प असला तरी भाजपने त्याद्वारे आपला 'राजकीय संकल्प'च सोडला आहे. विरोधक त्यावरून गदारोळ करणार हे स्पष्टच होते. निती आयोगाच्या बैठकीवर काँग्रेस शासित व इंडिया आघाडीतील घटक पक्षांची सत्ता असणाऱ्या राज्यातील मुख्यमंत्र्यांनी या मुद्यावरून बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. पण त्याची केंद्रातील मोदी सरकारला अजिबात फिकीर नाही, असे दिसते. या सगळ्यात खरी गोची झाली आहे ती भाजप सत्तेत असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची. एकीकडे त्यांना आपली निराशा लपवत व तोंड बांधून बुक्क्यांचा मार सहन करत केंद्रातील सरकारच्या या 'राजकीय संकल्पा'ची री ओढावी लागतेय तर दुसऱ्या बाजूला विरोधकांच्या हाती लागलेल्या या जबरदस्त मुद्याने जो टीकेच्या बॉम्बगोळ्यांचा जबरदस्त वर्षाव होतोय त्याचा सामना करावा लागतोय. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीची जोरदार सरशी झाल्याने अगोदरच बॅकफूटवर असणाऱ्या महायुतीच्या नेत्यांना तोंडावर आलेल्या विधानसभा निवडणुकीत या नव्याने उद्भवलेल्या संकटाचा सामना कसा करायचा, या विचारानेच पुरता घाम सुटला असेल.

## ● ज्ञानराधा व कुटे उद्योग समुहाच्या विरोधात जिल्ह्यातील ठेवीदार एकटवले

# जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला मोर्चा

### कुटेला आमच्या ताब्यात द्या, मेहनतीने जमा केलेली तुटपुंजी रक्कम हडपणाऱ्या कुटेला शिक्षा द्या, काही ठेवीदारांच्या डोळ्यातून अश्रु

**जालना। शिवाजी मस्के**

**ज्ञानराधा व कुटे उद्योगसमूहाने ठेवीदारांची फसवणूक करणार्या सर्व उर्वरित आरोपींना त्वरित अटक करावी. ज्ञानराधा व कुटे उद्योगसमूहाच्या मालमत्तासह प्रवर्तक संचालक भागीदार व्यवस्थापक किंवा सदस्य या सर्वांच्या जंगम अवस्थावर मालमत्ता त्वरित जप्त करावे व ठेवीदारांचे ठेवी त्वरित एमपी आयडी कायद्याच्या तरतुदीप्रमाणे वितरित करावे. एम. पी. आय. डी. कायद्यातील तक्रारींची संख्या पाहता जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे स्वतंत्र कक्ष स्थापन करून त्वरेने स्वतंत्र सक्षम प्राधिकरी यांचे नियुक्ती करावी.. भविष्यात अशे प्रकार होऊ नये म्हणून महाराष्ट्र शासनाने २९ सप्टेंबर २०१७ रोजी काढलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने त्वरित कार्यवाही करावी. ज्ञानराधा आणि कुटे समूहाच्या सर्व आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी एक स्वतंत्र तपासणी समिती गठित करावी. ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड या संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची आणि मालमत्तेची चौकशी करण्यासाठी प्रशासकाची नेमणूक करावी, आदी मागण्यांसाठी २६ जुलै रोजी जालना जिल्ह्यातील ठेवीदारांनी माजीमंत्री तथा आमदार राजेश टोपे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर थेट मोर्चा काढला होता. यावेळी संस्थेचे सुरेश कुटेच्या विरोधात ठेवीदारांनी जोरदार घोषणाबाजी केली.**






**आमदार राजेश टोपे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन**

जालना जिल्हाधिकार्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड यांचे संचालक मंडळ यांनी महाराष्ट्रभरात जवळपास ५० व मध्य प्रदेश मध्ये ०१ शाखा उघडून असंख्य गोरगरीब ठेवीदारांना यांचे क्रेडिट सोसायटी मध्ये जवळपास ३७१५ कोटी ५८ लाख ७३ हजार कोटी रकमेची ठेव ठेवून बेकायदेशीररित्या दि कुटे ग्रुप व इतर कुटे ग्रुपची सलग्नित कंपन्यांमध्ये परस्पर सर्व निधी वळवला व वेगवेगळ्या ठिकाणी बेकायदेशीररित्या पैशाची अफरातफर केली. त्या अनुषंगाने जवळपास महाराष्ट्र भरातील ग्रामीण भागातील अनेक लोकांनी ज्ञानराधा समूह व दि कुटे ग्रुप यांच्या संचालक प्रमोटर यांनी जास्तीचा बेकायदेशीर व्याज परतावा म्हणजेच जवळपास १३ टक्के व्याजदराचे अमिष दाखवून आणि त्यांच्या विविध योजनांना प्रभावित करून गोरगरीब जनतेला आपली कष्टाची रक्कम कोणी मुलीच्या लग्नासाठी ठेवलेली रक्कम, कोणी वृद्धापकाळामध्ये आजारपणामध्ये कामी येईल. म्हणून, आपल्या आयुष्यभराची सेवानिवृत्तीची रक्कम, इत्यादी अशा प्रयोजनासाठी ठेवलेल्या रकमा ज्ञानराधा व कुटे ग्रुपच्या संचालकांनी गिळंकृत केल्या. त्यामुळे यांचेवर एम. पी. आय. डी. कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करून त्यांच्या मालमत्ता जप्त होणे अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड यांच्याकडे फिक्स डिपॉजिट ठेवी ठेवलेल्या ठेवीदारांची संख्या सध्या घडीला १६५८७२ इतकी असून व त्याची रक्कम १७९० कोटी ०१ लाख ३७ हजार इतकी आहे व बचत खातेदारांची संख्या २०६६९७ असुण त्याची रक्कम १९२५ कोटी ५७ लाख ३६ हजार इतकी आहे दोन्ही रक्कमा मिळुन ३७१५ कोटी ५८ लाख ७३ हजार आहे. आजपर्यंत जवळपास ३५ पेक्ष्या जास्त ठिकाणी गुन्हे नोंद झाले असून भारतीय दंड संहितेच्या कलम ४०६, ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१ सह कलम ३४ व मुख्य म्हणजे महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९च्या कलम ३ व ४ अन्वये गुन्हे दाखल झालेले आहेत. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये गुन्हे दाखल होऊन देखील त्यापर्यंत सगळी कायद्यातील तरतुदींची पूर्तता केल्याचे दिसत नाही,सदरील कायद्यातील तरतुदीप्रमाणे सदरील व्यवस्थापनाच्या मालमत्ता जप्त करून लिलाव करण्याच्या दृष्टीने त्वरित शासनाला जिल्हाधिकारी यांचे मार्फत प्रस्ताव पाठवणे अत्यंत गरजेचे असताना देखील अद्याप पर्यंत त्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. परंतु या संपूर्ण प्रक्रियेमध्ये वित्तीय संस्था मधील सर्व मालमत्ता जप्त करून ठेवीदारांचे पैसे परत करण्याचे संबंधित सक्षम प्राधिकारी नियुक्त करण्यासाठी आदेश देण्याची सर्वस्वी जबाबदारी राज्य शासनाची आहे. तसेच आपल्या जालना जिल्ह्यात या कायद्याअंतर्गत दाखल प्रकरणाची वाढती संख्या यातील कायदेशीर क्लिष्टता लाखो ठेवीदारांचा गुंतवलेला पैसा व त्यांना कालबद्ध स्वरूपात त्यांचे ठेवी परत मिळवून देण्याची शासनासमोर आव्हान या सर्व बाबींचा विचार केल्यास या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र उपजिल्हाधिकारी/ शिक्षण प्राधिकारी असणे आवश्यक आहे, त्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने २९ जून २०१७ ला शासन निर्णय काढून स्पष्टता केलेली आहे त्या शासन निर्णयाची त्वरित अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड यांनी केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराच्या प्राथमिक चौकशीसाठी त्वरित प्रशासक नियुक्त करण्याची गरज आहे. सोसायटीच्या संचालक मंडळाने फसवणूक करून असंख्य ठेवीदारांची मोठी रक्कम आपल्या लाभासाठी वळवली आहे. त्यामुळे सदरील संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची आणि मालमत्तेची चौकशी करण्यासाठी प्रशासकाची नेमणूक अत्यावश्यक ठरते, प्रशासकाच्या चौकर ४/६ सादरीकरण करून, सोसायटीच्या आर्थिक स्थिती आणि गैरव्यवहारांची सविस्तर माहिती प्रदान केली जावी. तसेच, आवश्यक त्या कायदेशीर कारवाईसाठी अहवालाचा वापर केला जावा. यावेळी जिल्ह्यातील हजारो ठेवीदारांचा मोर्चात सहभाग होता. यावेळी अंबड चौफुलीवरुन काढण्यात आलेल्या मोर्चा थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर येवून थेट धडकला. यावेळी कुटे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आमदार राजेश टोपे यांनी जिल्हाधिकार्यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन दिले.

## शिक्षण सप्ताहाचे निमित्त संत बाळुदेव महाराज विद्यालय व महिला महाविद्यालय वृक्षरोपन

**पाटोदा। प्रतिनिधी**

शिक्षण सम्राट,माजी आमदार.भिमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाचे राष्ट्रीय सचिव माजी मंत्री तथा विधान परिषद आमदार पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस व शिक्षण सप्ताहाचे निमित्त पाटोदा येथील संत बाळुदेव महाराज विद्यालय व महिला महाविद्यालय येथे शिक्षक वर्ग व विद्यार्थी आणि शिक्षण प्रेमी यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घघाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक बोखारे सर, तसेच महिला महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र आविळेसर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे जे.एस.न्युजचे संपादक तथा दैनिक दिव्य वार्ता प्रतिनिधी



जावेद शेख, पत्रकार हमीदखान पठाण उपस्थित होते. यावेळी शाळेच्या परिसरात वड, पिंपळ, लिंबसह विविध प्रकारचे झाडांची लागवड करण्यात आली. यावेळी आशाबाई गर्जे मॅडम ,येवले मॅडम, कोल्हे मॅडम , देसाई सर ,वाघ सर, मोहळकर सर, शेख सर, बोडखे सर,राम देसाई व गौतम चंदनशिव तसेच शिक्षण प्रेमी नागरिक स्वामी सानप (सामाजिक कार्यकर्ते), प्रल्हाद सानप . पत्रकार सचिन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

## तट बोरगाव येथे ऊस, सोयाबीन शेतीशाळा संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मागील चार ते पाच दिवसापासून पडत असलेल्या संततधार पावसामुळे पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम होऊन वाढ खुंटली आहे, अशा विपरीत परिस्थितीमध्ये ऊस, सोयाबीन पिकाचे करावयाचे एकात्मिक कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापनाची माहिती शेतकऱ्यांना देण्याच्या अनुषंगाने नॅचरल शुगर, रांजणी आणि कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांची शेतीशाळा घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. शेतीशाळा वर्गामध्ये उपस्थित शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी सोयाबीन पिकामधील पिवळा मोझॅक विषाणू आणि सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे निर्माण झालेला पिवळसरपणा तसेच अळीवर्गीय किडी व रसोशक किडी यांची निरीक्षणे दाखवून अळीवर्गीय किडींच्या व्यवस्थापनासाठी कामगंध सापळे लावणे व रस शोषक किडींच्या व्यवस्थापनासाठी चिकट सापळे लावण्याबाबत मार्गदर्शन केले व मोझॅक विषाणूग्रस्त झाड शेतातून उपटून नष्ट करण्यात या सूचना दिल्या. ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी जमिनीमधील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराला चर तयार करावेत, सोयाबीन पिक पिवळसर दिसत असल्यास पानांद्वारे अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी १३:४०:१३ हे फॉलियर ग्रेड विद्राव्य खत ५ ग्रॅम अधिक मॅग्नेशियम सल्फेट दोन ग्रॅम अधिक महाराष्ट्र ग्रेड दोन सूक्ष्म अन्नद्रव्य दोन ग्रॅम प्रति एक लिटर पाण्यातून फवारणी करावी. सोयाबीन पिकामध्ये अळीवर्गीय किडींचा व्यवस्थापनासाठी क्लोरँट्रानिलीप्रोल ९.३% अधिक लॅंबडा सायहॅलोथ्रीन ४.६% झेडसी पूर्वमिश्रित कीटकनाशक ८० मिली किंवा क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५ एससी ६० मिली किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८% एससी १०० मिली किंवा आयसोसायक्लोसिरम ९.२% डीसी १२० मिली किंवा फ़्ल्युबेन्डामाईड २०% डब्ल्युजी १०० ग्रॅम किंवा फ़्ल्युबेन्डामाईड ३९.३५% एससी ६० मिली यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रासाठी फवारणी करावी. बुरशीजन्य रोग शेंग पापडी, शेंग करपा प्रादुर्भाव प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी पायराक्लोस्ट्रोबिन २०



डब्ल्यू जी १ ग्रॅम किंवा टेब्यूकोनॅझोल १०% अधिक सल्फर ६५% संयुक्त बुरशीनाशक दिड ग्रॅम किंवा फ्लुक्सापायरोक्साड अधिक पायराक्लोस्ट्रॉबिन एससी पूर्वमिश्रित संयुक्त बुरशीनाशक १ मिली प्रती १ लिटर पाण्यातून फवारणी करावी. ऊस पिकाचे अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी एकरी युरिया ७५ किलो, १०:२६:२६ खत १०० किलो, मॅग्नेशियम सल्फेट दहा किलो, महाराष्ट्र ग्रेड एक सूक्ष्म अन्नद्रव्ये १० किलो पेरून द्यावे. कांडी कीड व्यवस्थापनासाठी क्लोरअँन्ट्रानिलीप्रोल (०.४ टक्का) हे दाणेदार कीटकनाशक एकरी ८ किलो किंवा फिप्रोनिल (०.३ टक्का) दाणेदार १० किलो प्रमाणे सरीमधून द्यावे. ऊस पिकामध्ये नत्र स्थिरीकरण करण्यासाठी त्याचप्रमाणे संततधार पाऊस पडत असल्याकारणाने पिकाला पडत असलेल्या जैविक अजैविक ताणाचे व्यवस्थापन करण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे वसंत ऊर्जा पाच मिली अधिक हरितके पाच मिली प्रति एक लिटर पाणी याप्रमाणे पानांवर फवारणी करावी. वेगवेगळ्या कीडनाशकांची मिश्रणे एकत्र करू नये, कीटकनाशकासोबत विद्रव्य खते, संप्रेरके इत्यादी मिसळू नये. फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा सामू ५-७ असावा. कीटकनाशकाच्या डब्यावरील सूचना वाचून त्याचे पालन करावे व फवारणी करताना सुरक्षा साधनांचा वापर करावा असा सल्ला ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी दिला. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## पान १वरून...

### जीआर निघाला;

अदा करण्यात येणार आहेत. या रकमेमध्ये योजना कालावधीत बदल झाल्यास त्याप्रमाणे महावितरण कंपनीस शासनाकडून रक्कम वर्ग करण्यात येईल. तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप देण्याचे धोरणदेखील शासनाकडून ठरविण्यात आले आहे. ही योजना राबविण्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण कंपनीची असणार आहे.

------------

### ढ शिक्षकांचे पगार अर्धे होणार,

त्याला गणित, विज्ञान, इंग्रजी येतं की नाही याची चिंता कोणी करत नाही. यापुढे शिक्षकांना ही मुभा राहणार नाही. अनेक शिक्षकांना लाख, सव्वा लाख पगार असतो. मग मुलांची जबाबदारी त्यांच्यावर आहे. आतापर्यंत ही जबाबदारी ठरवण्यात आली नव्हती, असे दीपक केसरकर यांनी सांगितले. कोणत्याही शिक्षकाला सेवेतून दूर करणं हेतू नाही. मुलांचे शिक्षण हे शिक्षण खात्याचे अंतिम उद्दिष्ट होते. आतापर्यंत हे शिक्षण नाही तर शिक्षक खाते होते. त्यांच्या समस्या घेऊन सरकारकडे जात होते. त्यांच्या समस्या वर्षभरात सोडवण्यात आल्या आहेत. शिक्षकाने एकाच ठिकाणी राहून शिक्षणाचे काम कर्म करावे. शिक्षणाचा दर्जा वाढवण्यावर भर, जे शिक्षक यात कमी पडतील त्यांच्यावर कारवाई करणार असल्याचे केसरकर म्हणाले.

-------------

### जागा वाटपाबाबत काँग्रेसची

पक्षाने महाविकास आघाडीतील जागा वाटपासाठी १० सदस्यांची समिती स्थापन केली. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, नसीम खान, नितीन राऊत, सतेज पाटील यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे. मुंबईतील जागा वाटपाच्या समितीत मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड, भाई जगताप आणि अस्लम शेख यांची जागावाटपाच्या समितीत समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्याशिवाय युवा चेहरा विश्वजित कदम यांना या समितीत स्थान मिळालेले नाही. २३ जुलै रोजी दिल्लीतील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस के सी वेणुगोपाल यांच्या निवासस्थानी महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत विधानसभा निवडणुकीपर्यंत प्रदेश काँग्रेस संघटनेत कोणताही बदल होणार नाही, असा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या आधारे जागा वाटपाचा निर्णय घेण्यात आला. नुकतेच महाराष्ट्र दौऱ्यावर आलेले के सी वेणुगोपाल यांनी महाविकास आघाडीत समाविष्ट असलेल्या पक्षांसह महाराष्ट्र काँग्रेस महायुतीचा जोरदार मुकाबला करेल, असे सांगितले होते. तसेच, लोकसभा निवडणूक आणि त्यानंतर देशभरात झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाचा सफाया झाला आहे. आता महाराष्ट्रातही लोकांना बदल हवा आहे. महाविकास आघाडी विधानसभा निवडणूक एकत्र लढणार असून तिन्ही पक्ष एकत्र बसून जागा वाटपाबाबत चर्चा करणार आहेत. विधानपरिषद निवडणुकीत क्रॉस व्होटिंग करणाऱ्या ७ आमदारांवर कारवाई करण्याचे संकेतही के सी वेणुगोपाल यांनी दिले होते. पक्षात बेशिस्तपणा खपवून घेतली जाणार नसल्याचा इशाराही के सी वेणूगोपाल यांनी दिला होता. मात्र आजपर्यंत क्रॉस व्होटिंग करणाऱ्या आमदारांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

------------

### लाडक्या बहीणीचा ४६ हजार

मैदानात उतरवले आहे. पण राज्यातील वित्त विभागाने या योजनेवरील खर्चावरुन प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. लाडकी बहीण योजनेची गरज काय, असा सवाल वित्त विभागाने विचारला आहे. खर्चाचा ताळमेळ बसवताना वित्त विभागाची दमछाक होण्याची भीती आहे. लाडकी बहीण योजनेवर दरवर्षी ४६ हजार कोटींचा खर्च होणार असल्याची आकडेवारी समोर येत आहे. मध्यप्रदेश सरकारच्या धरतीवर ही योजना महाराष्ट्रात लागू केली आहे. त्यावरील खर्चावरुन आता वित्त विभागाला घाम फुटला आहे. या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर भार पडणार आहे. खर्चाची तरतूद करण्यावरुन आता विभागापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

-------------

### परळी नगर परिषदेत आग प्रतिरोधक

सहाय्याने आग विझविण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. या दुचाकीचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे 'वॉटरमिस्ट आणि सीएएफ बाइक माउंटेड फायर एक्टिंग्विशर' ही सर्वात आधुनिक आणि कॉम्पॅक्ट फायर कॉम्बॅट सिस्टीम असल्याने महत्त्वाच्या ठिकाणी होणारे मोठे नुकसान टाळता येते आणि आग फार कमी वेळात विझवता येते . या यंत्रणा प्राथमिक स्वरुपाच्या किंवा मध्यम स्वरुपाच्या आगीवर प्रभावीपणे वापरण्यात येतात. या यंत्रणेमध्ये कमीत कमी पाण्याचा वापर हा पाण्याच्या सूक्ष्म कणांच्या रुपाने आगीवर केला जातो, जेणेकरुन आगीची उष्णता ही पाण्याचे बाष्पीकरण करण्यासाठी होऊन आग थंड करण्याची प्रक्रिया जलद गतीने होते. तसेच पाण्याचे बाष्पीभवन झाल्याने आगीच्या सभोवताली असलेल्या प्राणवायुचा पुरवठा कमी होऊन आग विझविण्यास मदत होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. यंत्रणा एक किंवा दोन व्यक्ती हाताळू शकतात कार्यालये, शाळा इत्यादी सार्वजनिक इमारतीत याचा प्रभावीपणे उपयोग होतो. तेथील कर्मचा-यांना किमान प्रशिक्षण दिल्यास अग्निशमन दल घटनास्थळी येईपर्यंत आग काबूत येऊ शकते किंवा विझूही शकते. या यंत्रणेच्या वापरामुळे आगीच्या ठिकाणी पाण्यामुळे होणारे नुकसान कमी करणे सहज शक्य आहे.ही 'बाईक माऊंटेड मिस्ट टेक्नॉलॉजी' गर्दीच्या भागात प्रथम प्रतिसाद देणारे म्हणून ऑपरेशन सुलभ करणारे ठरणार आह. यावेळी मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, उपमुख्याधिकारी संतोष रोडे, लेखापाल सुदाम नरवडे, पंकज दहातोंडे, ज्ञानेश्वर ढवळे, अजय कलंत्री, गुट्टे तसेच नगरपालिकांचे अग्निशमन विभाग प्रमुख सुनिल आदोडे व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

--------------

### सरकारने आरक्षणाचा प्रश्न

नेत्या म्हणून त्यांचे नाव आहे. काल संसदेत मराठीतून भाषण करत राज्यात सुरू असलेल्या आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारची त्यांनी कानउघडणी केली. खा पाटील या नेहमीच अभ्यासूपणे शेतकरी उपेक्षित वंचित घटकांसाठी आवाज उठवत असतात. आरक्षणाच्या प्रश्नावर आवाज बुलंद केल्याबद्दल तीनही समाजाकडून समाधान व्यक्त केले आहे.

----------

### दुध भेसळखोरांविरोधात कठोर कारवाईसाठी

ही गंभीर बाब आहे. यामुळे विशेषतः लहान मुलांच्या आरोग्यवर गंभीर दुष्परिणाम होतो. आपल्या भावी पिढीचेही नुकसान होणार आहे. कर्करोगांसारखा दुर्धर आजारही अनेकांना जडतो. त्यामुळे भेसळखोरांवर एमपीडीएपेक्षांही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. अन्न पदार्थातील भेसळ व दुध तसेच दुग्धजन्य पदार्थांतील भेसळीविरोधात केंद्र व राज्य शासनाच्या दोन्ही यंत्रणांनी प्रभावीपणे कारवाईसाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा, मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यासाठी दोन्ही विभागांना सहकार्य केले जाईल. अद्ययावत प्रयोगशाळा, उपकरणे, मोबाईल प्रयोगशाळा यांसाठी केंद्राकडे पाठपुरावा केला जाईल. दुधातील भेसळीचा दुध उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसतो. त्याचबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर दूरगामी दुष्परिणाम देखील होतात. हे अत्यंत चिंताजनक असून, याला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. तातडीची उपाय योनजा म्हणून या दोन्ही विभागांनी संयुक्त मोहीमा आखाव्यात. त्यासाठी गृह विभागही सहकार्य करेल. दुधातील भेसळीविरोधात राज्याचा स्वतंत्र कायदा करण्यासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाने कार्यवाही करावी असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.याच बैठकीत माजी मंत्री धस यांनी काही समाजकंटकांमुळे दुध भेसळ उघडकीस आली की त्याचा दुध विक्रीवर परिणाम होतो, त्याचा फटका अंतिमतः दुध उत्पादक शेतकऱ्यांना बसत असल्याचे देखील सरकारच्या निदर्शनास आणून दिले.यावर गुरुवारी झालेल्या सह्याद्री अतिथिगृहाच्या बैठकीमध्ये वरील निर्णय घेण्यात आली या निर्णयाचे सुरेश धस यांनी स्वागत केले आहे.

------------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि.२७ जुलै २०२४

# शाळांमध्ये तिथी भोजन उपक्रम राबविण्याचे शिक्षणाधिकारी फुलारी यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये तिथी भोजन अर्थातच स्नेहभोजन कार्यक्रम राबविण्यात यावा असे आवाहन राज्याच्या प्राथमिक विभागाचे शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिनांक २४ जुलै २०२४ च्या आदेशान्वये दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व शाळा स्तरावर किती भोजन अर्थात स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे, असे आवाहन बीड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी केले आहे. यासंदर्भात या संदर्भात म्हटले आहे की, शिक्षक संचालक यांच्या आदेशानुसार दि. २३ जुलै ते २८ जुलै २९२४ च्या दरम्यान राबविण्यात येणाऱ्या शिक्षण सप्ताहमध्ये तिथीभोजन अर्थातच स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये लोकप्रतिनिधी, दानशूर व्यक्ती, आणि शाळा व्यवस्थापन समिती यांच्या माध्यमातून स्नेहभोजन, मिठाई आदी या सप्ताहात विद्यार्थ्यांना देण्यात यावे. या सप्ताहात विद्यार्थ्यांना कोणती पदार्थ देण्यात यावे याबाबत शाळा व्यवस्थापन समिती आणि संबंधित स्नेहभोजन देणाऱ्या व्यक्तीने ठरवावे. तसेच दिनांक २८ जुलै रोजी समाज सहभाग अंतर्गत मोठा कार्यक्रम घेण्यात यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# सुनंदा लोमटे यांनी श्री.योगेश्वरी देवीला अर्पण केली साडीचोळीसह सोन्याची बोरमाळ



अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे शक्तीपीठ व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या येथील श्री योगेश्वरी देवीच्या भक्त सामाजिक कार्यकर्त्या तथा हॉटेल पवन लॉजच्या मालक सौ. सुनंदा कल्याणराव लोमटे यांनी शुक्रवारी सकाळी देवीची विधिवत पूजा करून दोन तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ अर्पण केली.

श्री. योगेश्वरी देवीचे भक्त देवीवरील श्रद्धेमुळे सातत्याने देवीला विविध प्रकारचे दागिने भक्तीभावाने अर्पण करतात. येथील भक्त सौ.सुनंदा कल्याणराव लोमटे(मुकदम) रा. खडकपुरा, अंबाजोगाई यांच्या वतीने श्री योगेश्वरी देवीच्या चरणी दोन तोळे वजनाची सोन्याची बोरमाळ अर्पण करण्यात आली. यावेळी लोमटे परिवारातील अँड संतोष लोमटे,पवन लोमटे,अंगद लोमटे,प्रा.प्रज्ञा लोमटे,सुमेधा लोमटे, प्रा.गितांजली लोमटे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

# डॉ. आदित्य पतकराव फोर्ब्स मॅगझीनच्या टॉप ११ पायोनियर विथ लीडिंग व्हिजन मध्ये समाविष्ट

अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील भूमिपुत्र तथा पुण्याच्या नवी सांगवी येथील प्रसिद्ध दंतचिकित्सक आणि विश्वविक्रम धारक डॉ. आदित्य पतकराव यांनी फोर्ब्स मॅगझीनमध्ये स्थान मिळवून एक महत्वपूर्ण उपलब्धि साधली आहे. ही प्रतिष्ठित ओळख त्यांच्या अनवरत समर्पण आणि दंतचिकित्सा आणि समाजसेवा क्षेत्रातील असामान्य योगदानाला दर्शवते.

गेल्या ११ वर्षांपासून, डॉ. पतकराव आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध त्यांच्या अत्याधुनिक दंत रुग्णालयाच्या माध्यमातून दंतचिकित्सा क्षेत्रात अग्रणी राहिले आहेत. अंबेजोगाई (बीड) येथून आलेल्या डॉ. आदित्य यांची यात्रा प्रेरणादायक आहे. त्यांनी महत्वपूर्ण आव्हाने पार करत आंतरराष्ट्रीय ख्याति प्राप्त केली आहे आणि एक प्रमुख दंतचिकित्सक म्हणून उदयास आले आहेत.फोर्ब्स मॅगझीनमध्ये समाविष्ट झाल्यावर, डॉ. आदित्य यांनी आपली गहन कृतज्ञता व्यक्त केली: ''हे माझ्यासाठी मोठा सन्मान आहे आणि मला उत्कृष्टतेच्या दिशेने निरंतर प्रयत्न करण्यासाठी प्रेरणा मिळते. मी माझ्या सर्व रुग्णांचे, माझ्या परिवाराचे आणि माझ्या मित्रांचे त्यांच्या अटूट समर्थनासाठी मनःपूर्वक आभार मानतो.''

डॉ. आदित्य यांचा शानदार करिअर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सुशोभित आहे, ज्यात ब्रिटिश पार्लियामेंटरी अवार्ड, डेंटल ऑस्कर अवार्ड, सोक्रेट्स अवार्ड आणि इतर विविध राष्ट्रीय सन्मानांचा समावेश आहे. त्यांच्या योगदानाची प्रशंसा भारताचे १४ वे राष्ट्रपती, माननीय रामनाथ कोविंद यांनी देखील केली आहे, ज्यांनी दंतचिकित्सा आणि समाजसेवेत डॉ. आदित्य यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.या पुरस्कारांव्यतिरिक्त, महाराष्ट्र राज्य आणि यूपीएससी स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकात देखील डॉ. आदित्य पतकराव यांच्या उपलब्धींची नोंद केली गेली आहे, ज्यामुळे त्यांच्या क्षेत्रातील त्यांची वारसा आणि प्रभाव अधिक मजबूत झाला आहे. स्थानिक समुदाय आणि सहकाऱ्यांनी डॉ. आदित्य यांच्या उपलब्ध्यांवर अत्यंत अभिमान व्यक्त केला आहे आणि त्यांच्या भविष्याच्या निरंतर यशासाठी आणि दंतचिकित्सा क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



पिंपळवंडी:- पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे दि.२५ गुरुवार रोजी आष्टी-पाटोदा- शिरूर मतदार संघाचे नेते राष्ट्रवादी युवक काँग्रेस(शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख यांनी सदिच्छा भेट दिली.याप्रसंगी त्यांचा व शिरूर नगरपंचायतचे नगरसेवक अमोल चव्हाण यांचा सत्कार करताना विजय पवार (दुकानदार) तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जेष्ठ नेते किसन अण्णा पवार,राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष विनोद पवार,शेख युसुफ सर आदीसह पत्रकार

# शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बबन पवार

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील तांबा राजुरी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते या पालक सभेच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे मावळते अध्यक्ष संतोष तांबे हे होते.



या पालक सभेचे प्रास्ताविक सोंडगे सर यांनी केले या पालक सभेमध्ये शालेय समितीचे पुनर्गठण, शालेय उपक्रमाचे आयोजन आदी विषयांवर चर्चा करण्यात आली व शालेय व्यवस्थापन समितीची नव्याने निवड करण्यात आली. सर्व पालकांच्या सर्वानुमताने बबन पवार सर यांची शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर अनिल तांबे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. निकिता कदम, सुरेखा भंडारे, केशव तांबे, आशा नेमाने, स्वाती तांबे, लक्ष्मण तांबे सर, चंद्रकांत तांबे (ग्रा पं सदस्य) यांची शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

यावेळी पालकांनी प्रचंड उत्स्फूर्तपणे उपस्थिती दर्शवली. महिला पालकांची ही उपस्थिती होती . या पालक सभेमध्ये निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा पालकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा तांबाराजुरी पाटोदा तालुक्यातील नावाजलेली शाळा होती, या शाळेचे गतवैभव पुन्हा प्राप्त करणे माझे उद्दिष्ट असून शाळेमध्ये मागील दोन वर्षापासून विविध उपक्रम राबविले जातात आणि यापुढेही राबविले जातील व गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणार असे मत शालेय व्यवस्थापन समिती चे नवनियुक्त अध्यक्ष बबन पवार सर यांनी मांडले. पालक सभा अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. पालक सभेत उपस्थित सर्वांचे आभार तांदळे सर यांनी मानले.

## कार्यालय, उपनिबंधक सहकारी संस्था तालुका बीड

जा.क्र. उपनि/वि-२/कलम१०१-जाहीर प्रगटन/२०२४

दिनांक: २५/०७/२०२४

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ जाहीर प्रगटन

मराठवाडा अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी ली; बीड. या संस्थेने खालील व्यक्तीस कर्ज वाटप केले आहे. सदर कर्ज थकीत असल्यामुळे त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करून कर्जाची वसुली करण्यासाठी सदरहून संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये कार्यवाही करण्यासाठी वसुली प्रमाणपत्राच्या मागणीसाठी प्रकरण दाखल केले आहे. सदर कर्जदार व त्यांचे जामीनदार यांना कार्यालयाने प्रकरणाच्या सुनावणीसाठी पोस्टाने नोटीसा पाठविल्या आहेत. परंतु कर्जदार व जामीनदार दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने,गावी हजार नसल्याने किवा घेण्यास इनकार दिल्याने परत आल्या आहेत. तर काही प्रकरणाच्या नोटीसा तामील झाल्याच्या पावत्या कार्यालयास मिळाल्या आहेत. परंतु जे गैरअर्जदार हे सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. करिता या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि. सदर वसुली प्रमाणपत्र देण्यापूर्वीआपले म्हणणे मांडण्यासाठी उपनिबंधक सहकारी संस्था तालुका बीड. सहकार शक्ती इमारत, दुसरा मजला, जालना रोड बीड. येथे दि.०१/०८/२०२४ वार गुरुवार रोजी सकाळी ठीक ११:०० वा. प्रत्यक्ष अथवा विधिज्ञ मार्फत उपस्थित राहावे. आपले लेखी अथवा तोंडी म्हणणे उक्त दिवशी दाखल करावे. आपण हजार राहून म्हणणे मांडले नाही तर आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून प्रकरणी निर्णय देण्यात येईल. याची विशेष नोंद घ्यावी.

### मुख्य शाखा

| अ.क्र. | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | वसूल पात्र रक्कम रुपये | सुनावणी दिनांक | कर्ज खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार- ससाणे गणेश बाबुराव मु.पो-राजुरी (न),ता.जि.बीड. जामीनदार- १.ससाणे विनोद अशोक मु.पो-राजुरी (न),ता.जि.बीड. २. ससाणे मोतीराम जनार्धन मु.पो-राजुरी (न),ता.जि.बीड. | ७८,९५१/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन २०००१३७ |
| २. | कर्जदार- वैत्तके आसाराम बापूराव रा.स्वामी विवेकानंद कॉलनी,बालेपीर, नगर रोड,बीड जामीनदार- १.सोमानी ओमप्रकाश हनुमान रा.भगवान इंग्लिश स्कूल जवळ,मिरगे रो हाउस नं.१,अंकुश नगर,बीड. २.मैंदाड शहादेव किशनराव रा.पांगरी रोड,उमा किरण समोर,शाहू नगर बीड | २,३८,५९९/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | वाहन तारण कर्ज- २०००१५० |
| ३. | कर्जदार- एमट्रेडिंग कंपनी वय. प्रो.पवार प्रभू सोपान मु.गुंधेवाडी पो.पिंपळनेर ता.जि.बीड जामीनदार- १. निकम सुभाष रामभाऊ मु.गुंधेवाडी पो.पिंपळनेर ता.जि.बीड २. कानडे भाऊसाहेब खुशाल मु.गुंधेवाडी पो.पिंपळनेर ता.जि.बीड | ३,२५,०३७/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन २०००३८५ |
| ४. | कर्जदार- आर्या मेडिकल अँड जनरल स्टोअर्स प्रो.मिटकर पवन सुधाकर रा./ गुंडाप्पा,रेल्वे स्टेशन रोड,निरामय हॉस्पिटल शेजारी, श्री तिरुपती बालाजी मंदिर महाद्वार,केशरी विद्या मंदिर रोड, मधुबन कॉलनी,जुना जालना,जालना जामीनदार- १.मोहिते बालाजी राम मु.जीरेवाडी पो.बीड ता.जि.बीड २. श्रीसागर राहुल केशव संजीवनी मेडिकल,सारंकर बिल्डींग, पांगरी रोड,अंबिका चौक,बीड | ५०.७४७/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | क्लीन लोन- २०००५०७ |

### मांजरसुंबा शाखा

| अ.क्र. | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | वसूल पात्र रक्कम रुपये | सुनावणी दिनांक | कर्ज खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार- काळकुटे ऋषिकेश मधुकर मु.ससेवाडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड. जामीनदार- १.सांगळे बाळू विठ्ठल मु.पोखरी पो.लिंबागणेश ता.जि.बीड. २. काळकुटे रवींद्र रमेश मु.ससेवाडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड. | ६७,५०८/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | क्लीन लोन- ६०००१९ |
| २. | कर्जदार- सांगळे बाळू विठ्ठल मु.पोखरी पो.लिंबागणेश ता.जि.बीड. जामीनदार- १.कोळपे सुभाष विठ्ठल मु.बेळगाव पो.लिंबागणेश ता.जि.बीड. २.काळकुटे ऋषिकेश मधुकर मु.ससेवाडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड. | ४०,८५०/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | क्लीन लोन- ६००००२७ |
| ३. | कर्जदार- दराडे प्रवीण भागवत मु.दरड्याचा वाडा,पो.मोरगाव ता.जि.बीड. जामीनदार- १.दराडे संजय बाबासाहेब मु.दरड्याचा वाडा,पो.मोरगाव ता.जि.बीड. २.येडे जितेंद्र रघुनाथ मु. पो. मोरगाव ता. जि. बीड. | ७८,७८०/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | क्लीन लोन- ६०००११ |
| ४. | कर्जदार- भोसले दत्ता सीताराम मु.पो.खडकी घाट ता.जि.बीड. जामीनदार- १.मोरे मंगेश शेषेराव मु.रौळसगाव पो.खडकी घाट ता.जि.बीड. २.डिसले नानासाहेब बबन मु.वैतागवाडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड. | ३२,८३०/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | क्लीन लोन- ६००००६ |
| ५ | कर्जदार- वाघिरे रामेश्वर अर्जुन मु.उदंडवडगाव पो.मोरगाव ता.जि.बीड. जामीनदार-१.रसाळ मनोज मोहन मु.पो.मांजारसुंबा ता.जि.बीड. २.वाघिरे अर्जुन ज्ञानोबा मु.उदंडवडगाव पो.मोरगाव ता.जि.बीड. | ३०,५५६/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | क्लीन लोन- ६०००२३ |

### लिंबागणेश शाखा

| अ.क्र. | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | वसूल पात्र रक्कम रुपये | सुनावणी दिनांक | कर्ज खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार- मंगलमुर्ती ट्रेडिंग कंपनी प्रो.नांदे सचिन श्रीहरी मु.मंझेरी पो.पाचांग्री ता.जि.बीड. जामीनदार- १.वायभट रविंद्र रंगनाथ मु.पिंपरनई पो.लिंबागणेश ता.जि.बीड. २.सावंत भारत सहदेव मु.पिंपरनई पो.लिंबागणेश ता.जि.बीड. | ७,६७,६१२/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | कॅश क्रेडीट- ५००००१ |
| २. | कर्जदार- मावळा मेन्सवेअर प्रो.जाधव दत्ता सतीश मु.पो.अंजनवती ता.जि.बीड. जामीनदार- १.येडे भागवत कल्याण मु.पो.अंजनवती ता.जि.बीड. २.जाधव सतीश सुदाम मु.पो.अंजनवती ता.जि.बीड. | ५,३९,२६६/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | कॅश क्रेडीट- २००००६ |
| ३. | कर्जदार- माउली क्लोथ सेंटर प्रो.वायभट ज्ञानेश्वर नाना मु.पिंपरनई पो.लिंबागणेश ता.जि.बीड. जामीनदार- १.वायभट अनुसया नानाभाऊ मु.पिंपरनई पो.लिंबागणेश ता.जि.बीड. २.दाभाडे अमोल गोरख मु.पिंपरनई पो.लिंबागणेश ता.जि.बीड. | ५,६५,८५४/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | कॅश क्रेडीट- ५००००५ |
| ४. | कर्जदार- जाधव विवेक राजेंद्र मु.पो.अंजनवती ता.जि.बीड. जामीनदार- १.जाधव शाम प्रभाकर मु.पो.अंजनवती ता.जि.बीड. २.जाधव राजेंद्र दत्तात्रय मु.पो.अंजनवती ता.जि.बीड. | ७,४३,१७८/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन- ५०००१० |
| ५ | कर्जदार- बन बाळू विश्वनाथ मु.घारगाव पो.अंजनवती ता.जि.बीड. जामीनदार- १.येडे अशोक किसनराव मु.पो.अंजनवती ता.जि.बीड. २.येडे रेवण राजेंद्र मु.पो.अंजनवती ता.जि.बीड. | १,२०,८४८/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन- ५०००१९ |

### राजुरी (न) शाखा

| अ.क्र. | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | वसूल पात्र रक्कम रुपये | सुनावणी दिनांक | कर्ज खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार- बहीर अशोक राम मु.शिरापूर (धु.) पो.राजुरी (न) ता.जि.बीड. जामीनदार- १.गवळी शिवाजी रामभाऊ मु.बेलुरा पो.राजुरी (न) ता.जि.बीड. २.गवते बंडू मारोती मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. | ४,७७,६०३/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन- ४०००३८ |
| २. | कर्जदार- तुळसाबाई दत्तोबा येवले मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. जामीनदार-१.बहीर रतन अंबादास मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. २.बहीर अर्जुन सीताराम मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. | ५,८८,४९९/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | पगार तारण कर्ज- ४००००३ |
| ३. | कर्जदार- शिंदे उध्दव श्रीपती मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. जामीनदार- १.राजपुरे अभिमान गजानन रा.पालवण रोड,शिवाजी नगर,बीड. २.शिंदे गांधारी उध्दव मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. | ६,०७,९४७/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन- ४०००२४ |
| ४. | कर्जदार- बहीर भगवान आत्माराम मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. जामीनदार- १.बहीर भगवान आत्माराम मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. २.काळे बंडू किसनराव रा.सहारा हॉटेल च्या बाजूस, कालिका नगर,नगर रोड ,बीड. | ७,२६,४०४/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन- ४०००१९ |
| ५ | कर्जदार- कदम कौशल्या अंगत मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. जामीनदार- १.कदम लहू भास्कर मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. २.गावडे रामहरी लक्ष्मण मु.पो.राजुरी (न) ता.जि.बीड. | ६,५५,३०३/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | ग्रह कर्ज- ४००००२ |

# अंबाजोगाई लागतच काळवटी तलाव ओव्हरफ्लो तर मांजरा धरण मृतसाठ्याबाहेर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



यंदा मान्सूनच्या सुरुवातीपासूनच चांगला पाऊस पडत आहे. जवळपास मागील दहा दिवसापासून अंबाजोगाईकरांना सूर्यदर्शन झाले नसून सतत ढगाळ वातावरण किंवा पावसाच्या सरी सुरु आहेत. अंबाजोगाई शहर व परिसरातील पावसामुळे शहरासाठी राखीव असलेला काळवटी साठवण तलाव ओव्हर फ्लो झाला आहे. गुरुवारी (दि.२५) या तलावाच्या सांडव्यावरून पाणी वाहू लागले आहे. काळवटी साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे अंबाजोगाईकरांची पाण्याची चिंता मिटली आहे.

शहराला मुख्यत्वे धनेगाव धरणातून पाणीपुरवठा होतो, तेथून पाणीपुरवठा थांबल्यास शहरासाठी राखीव असलेल्या काळवटी तांडा येथील साठवण तलावातून अंबाजोगाईकरांची तहान भागवली जाते. त्यामुळे काळवटी साठवण तलावाचे अंबाजोगाईकरांसाठी अनन्य साधारण महत्व आहे. या तलावाची साठवण क्षमता १.४१ दशलक्ष घनमीटर एवढी असली तरी हा तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यास अंबाजोगाईला या तलावाचे पाणी किमान सहा महिने पुरते. त्यामुळे अंबाजोगाईकरांसाठी ही आनंदाची बातमी आहे. दरम्यान, चांगला पाऊस झाल्याने शहर व परिसरातील डोंगररांगा हिरवाईने नटल्या आहेत. त्यामुळे बुट्टेनाथ, नागनाथ, काळवटी तांडा हा परिसर सौंदर्याने नटला असून निसर्गप्रेमींना खुणावत आहे.

मांजरा मृतसाठ्याबाहेर

एकूण २२४ दलघमी पाणी साठवण क्षमता असलेल्या मांजरा धरणातील पाणी साठ्यावर बीड लातूर उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील शेकडो गावांचा पाणी पुरवठा अवलंबून आहे. यावर्षी मांजरा धरण प्रवण क्षेत्रात पडलेल्या पावसामुळे पाण्याची चांगली आवक झाली असून धरण मृतसाठ्याच्या बाहेर आले आहे. गुरुवारी (दि.२५) मिळालेल्या अधिकृत माहिती नुसार सकाळी सात वाजता मांजरा धरणात ४७.२८२ दलघमी पाणी साठा जमा आहे.

# चौसाळा येथे भूषण खिंवसरा याच्या १५ उपवासाची शनिवारी पचकावणी

चौसाळा । प्रतिनिधी

येथील पावन भूमी मध्ये परमपूज्य श्री दिलीपकवरजी म.सा. यांच्या सुशिष्या स्वाध्याय प्रेमी परमपूज्य श्री कुसुमकँवरजी म.सा. आणि प्रवचन प्रभाविका परमपूज्य श्री अरुणप्रभाजी म.सा. आधी ठाणा २ यांच्या सानिध्या मध्ये भूषण जवाहरलाल खिंवसरा यांनी निरंकार १५ उपवास केले असून त्याची पचकावणी शनिवार दि. २७/७/२०२४ रोजी चौसाळा येथे होणार आहे



चौसाळा सारख्या छोट्या गावामध्ये जैन समाजाचे कमी घर असताना २४ वर्षानंतर चातुर्मासचा योग आला सध्या एकासना ,आंबील ,वास ,तेला, आठाई अशा बऱ्याच तपस्या चालू आहेत. शनिवारी सकाळी ८:०० वाजता त्यांच्या निवासस्थान वरून वरघोडा ( मिरवणूक )निघून जैन स्थानकात पोहोचणार आहे ९:०० (नऊ वाजता) त्यांची पचकावणी होणार आहे छत्र मास चे मार्गदर्शक सुभाष बेदमुथ्था ,अशोक लोढा हे आहेत.पचकावणी झाल्यानंतर गौतम प्रसादी ठेवलेली आहे अशी माहिती चातुर्मास कमिटी अध्यक्ष आनंद नहार, संदेश खिंवसरा, नितीन लोढा, वृषभ धोका ,उमेश लोढा ,सतीश कोचर, आनंद लोढा ,भूषण खिंवसरा, मयूर नहार , रोशन खिंवसरा, रमण कोचर, राजेश लोढा, पारस धोका ,अनुप बेदमुथा, विनोद धोका, संतोष लोढा, देवेंद्र बोरा आणि वर्धमान श्रावक संघ चौसाळा यांनी हा दिली आहे

### पाली शाखा

| अ.क्र. | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | वसूल पात्र रक्कम रुपये | सुनावणी दिनांक | कर्ज खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार- पाटील उत्तम राजेंद्र मु.पो-करचुंडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड जामीनदार- १.कांगरे श्रीकृष्ण बाबुराव मु.करचुंडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड २.कतले सत्यवान राजेंद्र मु.करचुंडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड | ११,१६,६००/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन ३०००४७ |
| २. | कर्जदार-राऊत योगिराज आसाराम मु.पो.पाली ता.जि.बीड जामीनदार- १ खरात दत्तात्रय बाजीराव मु.पो.पाली ता.जि.बीड २ राउत नारायण आसाराम मु.पो.पाली ता.जि.बीड | १,७०,४४६/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन ३०००४१ |
| ३ | कर्जदार-शेख अनिस गौसोद्दिनी मु.पो.पाली ता.जि.बीड जामीनदार- १ सय्यद सत्तार सय्यद खाज मु.पो.पाली ता.जि.बीड २ शेख जैनोद्दीन शेख वालीयोद्दीन मु.पो.पाली ता.जि.बीड | २,०७,७४७/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन ३०००४४ |
| ४ | कर्जदार- शेख इरफान अरेफ मु.पो.पाली ता.जि.बीड जामीनदार- १ शेख खालील न्हानू मु.पो.पाली ता.जि.बीड २ शेख असेफ इब्राहीम मु.पो.पाली ता.जि.बीड | १,०३,९८२/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन ३०००४२ |
| ५ | कर्जदार - तावरे दादाराव ज्योतीराम मु.आहेरवडगाव पो.पाली ता.जि.बीड जामीनदार- १ कापले आत्माराम गोविंदराव मु.आहेरवडगाव पो.पाली ता.जि.बीड २ तावरे ज्योतिराम धोंडीराम मु.आहेरवडगाव पो.पाली ता.जि.बीड | ३,५१,६७१/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन ३०००५९ |
| ६ | कर्जदार- नवले महेश मधुकर मु.पो.पाली ता.जि.बीड जामीनदार- १ नवले सतिश अश्रुबा मु.पो.पाली ता.जि.बीड २ सय्यद सत्तार सय्यद खाजा मु.पो.पाली ता.जि.बीड | १,०२,८२९/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | टर्म लोन ३०००३८ |
| ७ | कर्जदार पवार नितीन जिवन मु.पो.पाली ता.जि.बीड जामीनदार- १.भंडाने तुळशीराम संपती मु.करचुंडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड २ खरात दत्तात्रय बाजीराव मु.पो.पाली ता.जि.बीड | २७,९४५/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | वाहन तारण कर्ज ३०००११ |
| ८ | कर्जदार- भंडाने राजेंद्र विष्णू मु.करचुंडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड जामीनदार- १ कांगरे श्रीकृष्ण बाबुराव मु.करचुंडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड २ पाटील उत्तम राजेंद्र मु.करचुंडी पो.मांजरसुंबा ता.जि.बीड | १,३६,६६५/- | दि.०९/०७/२०२४ वेळ- स.११:०० दि.२३/०७/२०२४ वेळ- स.११:०० | वाहन तारण कर्ज ३०००२७ |

सदर नोटीस दिनांक : २५/०७/२०२४ रोजी माझ्या सही व मुद्रेसह दिली आहे.
ठिकाण : बीड

स्वाक्षरित/-
(एस.बी.घोडके)
उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड

cmyk

# शेतकऱ्यांना ५ वर्ष मोफत वीज मिळणार

## राज्यातील शेतकऱ्यांना फायदा, शासनाने काढला जीआर

मुंबई : शेतकऱ्यांसाठी मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेनुसार जे शेतकरी ७.५ एचपी म्हणजे अश्वशक्तीपर्यंत कृषी पंप वापरतात त्या शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. पुढील पाच वर्ष मोफत वीज देण्यासंदर्भातील जीआर शासनाने काढला आहे. एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ दरम्यान ही योजना लागू करण्यात येणार आहे. ४४ लाख ०३ हजार शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे.

सरकारनं अर्थसंकल्पात शेतकऱ्यांचे वीज बील माफ करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार आता जीआर काढण्यात आला आहे. या योजनेचा राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. दरम्यान, या योजनेला तीन वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिचा आढावा घेऊन पुढील कालावधीत योजना राबवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे जीआरमध्ये सांगण्यात आले आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपाची वीज मोफत देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री अजित पवार यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात अर्थसंकल्प



सादर करताना जाहीर केला होता. कृषी पंपांच्या बिलाच्या वसुलीची चिंता महावितरणला नेहमीच असते. मात्र, आता या वीज बिलापोटीचे १४७६० कोटी रुपये सरकार महावितरणला देणार असल्याने त्यांची चिंता मिटणार आहे. कृषी पंप वीज बिलाची एकूण थकबाकी ५० हजार कोटी रुपये आहे. या वीज बिल माफीसाठी येणारा खर्च राज्य सरकार उचलेल. त्या पोटी राज्य सरकार महावितरणला १४ हजार ७६० कोटी रुपयांचे अनुदान दरवर्षी देणार आहे. राज्यात मार्च २०२४ अखेर ४७.४१ लाख कृषीपंप ग्राहक शेतकरी आहेत. एकूण वीज ग्राहकांच्या तुलनेत हे प्रमाण १६ टक्के आहे. ३० टक्के वीज कृषी पंपांसाठी वापरली जाते. कृषी ग्राहकांचा सध्याचा एकूण वार्षिक वीज वापर ३९ हजार २४६ दशलक्ष युनिट आहे. राज्यात कृषी पंपांना रात्री ८/१० तास किंवा दिवसा ८ तास वीजपुरवठा केला जातो.

७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेचे कृषीपंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ नाही

दरम्यान, जे शेतकरी ७.५ एचपीपर्यंत कृषी पंप वापरतात त्यांना मोफत वीज मिळणार आहे. म्हणजेच ७.५ एचपीपेक्षा कमी क्षमतेचे कृषी पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांनाही मोफत वीज मिळणार आहे. केवळ ७.५ एचपी पंपासाठी हा निर्णय नाही. पण ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षेमतेचे कृषी पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना वीज बील भरावे लागेल. म्हणजेच काय ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेचे कृषी पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना या योनजेचा लाभ मिळणार नाही.

# जनावरातील पोटाच्या आजारावर घरगुती उपाय



पावसाळा सुरू झाला की या काळात जनावरांना वेगवेगळे आजार होतात. विशेषतः पोटाशी संबंधित समस्या जास्त प्रमाणात आढळून येतात. जनावरांना पोटफुगी, अतिसार आणि इतर पोटाच्या विकारावर घरगुती उपाय चांगले फायद्याचे ठरतात. सौम्य पोटफुगी : पोटफुगी झाल्यावर जनावर जास्त प्रमाणात खात पीत नाही, सुस्त पडतात. जनावरांच्या पोटाचा आकार विशेषतः डाव्या बाजूचा जास्त प्रमाणात वाढतो. श्वासोच्छावासास त्रास होतो. घरगुती उपाय - ५० ग्रॅम आले, १ पूर्ण लसूण, ३ वेलची, ५ ते ६ लवंगा, हे सर्व अर्धा लिटर पाण्यात उकळून त्यात थोडासा गूळ टाकून काढा तयार करा. दिवसातून एकदा २ दिवस हा काढा जनावरांना द्या. काढा दररोज ताजा तयार करा. वासरांना काढ्याची अर्धी मात्रा द्यावी.

अतिसार : दूषित पाणी पिल्यामुळे हा आजार होतो. यामुळे जनावरांना पाण्यासारखे पातळ जुलाब होते. अशक्तपणा येतो. घरगुती उपाय - मूठभर चहाची पाने एक लिटर पाण्यामध्ये उकळवा. गाळून त्यात अर्धा मूठ आले घाला. हे द्रावण दिवसातून दोनदा ३ ते ४ दिवस भिजवा. दररोज नवीन तयार करा. पेरूची ताजी पाने अर्धा किलो पाने तीन ग्लास पाण्यात उकळून घ्या. या द्रावणाने जनावरांना दिवसातून दोनदा भिजवून काढा. १ लिटर पाण्यात पोटॅशियम परमँगनेटचे ५ ते १० खडे मिसळा. या द्रावणाने जनावरांना दिवसातून दोनदा भिजवून काढा. इतर पोटाचे विकारावर घरगुती उपाय : आल्याचा रस ५०० मिली, शेवग्याच्या पानांचा रस ५०० मिली, मध २०० मिली. हे सर्व एकत्र मिसळून २ दिवस दिवसातून दोनदा द्या. सूचना - जनावरात आजाराचे प्रमाण वाढल्यास त्यांना त्वरित पशुवैद्यकाकडे घेऊन जा आणि योग्य उपचार करा.

# आडसाली उसाच्या वाढीसाठी घ्या काळजी

सध्या आडसाली ऊस लागवडीचा कालावधी सुरू आहे. राज्यात मुख्यत्वे उसाची लागवड आडसाली, पूर्वहंगामी आणि सुरू हंगामात केली जात असली तरी आडसाली हंगाम फायदेशीर दिसून येतो. त्यामुळे शेतकरी सुद्धा आडसाली हंगामात ऊस लागवडीला प्राधान्य देतात. आडसाली उसाची उत्पादकता वाढविण्यासाठी जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन, सुधारित ऊस वाणांचा आणि दर्जेदार बियाण्याचा वापर, रोप लागवड तंत्र, ठिबक सिंचनद्वारे पाणी आणि खत व्यवस्थापन, तण नियंत्रण आणि आंतरमशागत या पंचसूत्री तंत्रज्ञानाचा वापर केल्यास अपेक्षित उत्पादन मिळू शकेल.

अधिक उत्पादन देणारे ऊस वाण : आडसाली ऊस लागवडीसाठी को. ८६०३२ (निरा), कोएम ०२६५ (फुले २६५), फुले ऊस १५०१२, फुले ऊस १३००७ आणि व्हीएसआय ८००५ या अधिक उत्पादन देणार्या वाणांची लागवड करावी. महाराष्ट्रामध्ये को ८६०३२ वाणाची ५० ते ५५ टक्के आणि फुले २६५ वाणाची ३० ते ३२ टक्के क्षेत्रावर लागवड केली जाते.

बेणे निवड : लागणीसाठी ऊस बेणे मळ्यातील ९ ते ११ महिने वयाचे अनुवांशिकदृष्ट्या शुध्द आणि निरोगी बियाणे वापरावे. उसाचे बियाणे लांब कांड्यांचे व फुगीर डोळ्याचे आणि रसरशीत असावे. दर तीन वर्षानी बेणे बदलावे. अनुवंशिकदृष्ट्या शुध्द बेणे वापरल्यास ऊस उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते. २०२३ मध्ये पाडेगाव केंद्राने शिफारस केलेल्या फुले सुपरकेन नर्सरी तंत्रज्ञानातून उसाची रोपे शेतामध्येच तयार करून लागवड करावी.

बेणे प्रक्रिया : उसावरील काणी रोगाचा बंदोबस्त करण्यासाठी तसेच कांडीवरील खवले कीड व पिठ्या ढेकूण यांच्या नियंत्रणासाठी हेक्टरी १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम व ३०० मि.ली. डायमिथोएट १०० लिटर पाण्यात मिसळून बेणे १० मिनिटे बुडवावे.



वरील प्रक्रियेनंतर ॲसिटोबॅक्टर १० किलो व स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत १.२५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात टिपरी ३० मिनिटे बुडवून नंतर लागवड करावी. जीवाणू खताच्या प्रक्रियेमुळे ५० टक्के नत्र व २५ टक्के स्फुरद खताची बचत होते.

लागवड तंत्र : आडसाली उसाची लागवड १५ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधीत करावी. रिजरच्या सहाय्याने भारी जमिनीत १५० सें.मी. व मध्यम भारी जमिनीत १२० ते १३५ सें.मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात. सरीची लांबी उतारानुसार २० ते ४० मीटर ठेवावी. एक डोळा पद्धतीने डोळा वरच्या बाजूस ठेवून १ फुट अंतरावर व दोन डोळ्यांची टिपरी वापरावयाची असल्यास दोन टिपऱ्यामधील अंतर अर्धा फूट ठेवून लागण करावी. जोडओळ पट्टा पद्धतीने लागवड करावयाची असल्यास मध्यम जमिनीसाठी २.५ फुटावर तर भारी जमिनीसाठी ३ फुटावर सलग सऱ्या पाडाव्यात. भारी जमिनीत कोरड्या पद्धतीने आणि हलक्या जमिनीत ओल्या पद्धतीने उसाची टिपरीने लागवड करावी, जेणेकरून टिपरी पद्धतीने लागवड केलेल्या उसाची उगवण चांगल्या पद्धतीने होण्यास मदत होईल. रोपांनी लागवड करताना सरी ओली करून त्यानंतरच लागवड करावी किंवा उसाची रोपे पाण्यामध्ये दाबून लागवड करावी. जेणेकरून रोपांची मर होत नाही.

आडसाली उसातील आंतरपिके : आडसाली हंगामात आंतरपिके घेताना योग्य आंतरपिकाची निवड करणे गरजेचे आहे, अन्यथा आंतरपिकामुळे मुख्य ऊस पिकाकडे दुर्लक्ष होऊन उत्पादनात घट येते. आडसालीमध्ये खरीप हंगामातील भुईमुग, चवळी, सोयाबीन व भाजीपाला इत्यादी आंतरपिके घेता येतात. ऊस पिकामध्ये ताग, धैंचा यासारख्या हिरवळीच्या पिकांचा आंतरपिक म्हणून समावेश करता येतो व बाळबांधणीच्यावेळी हिरवळीची पिके सरीमध्ये गाडून बाळ बांधणी करता येते. यामुळे जमिनीची सुपीकता टिकविण्यास मदत होते.

# टोमॅटो फळ पोखरणारी अळी नियंत्रण

टोमॅटो पिकातील फळ पोखरणाऱ्या अळी याविषयी सविस्तरपणे माहिती घेण्याची गरज आहे. कारण या अळीमुळे मोठे नुकसान होते. यामध्ये ही अळी नेमकी काय आहे, तिचा प्रादुर्भाव कशामुळे होतो, तिचा प्रसार कसा होतो, तिची लक्षणे काय आहे आणि या अळीच्या नियंत्रणसाठी कोणती औषधे आहेत याबद्दल माहिती असल्यास त्यावर नियंत्रण करणे सोपे होते.

अंडी, अळी, कोष आणि प्रौढ, अशा अळीच्या साधारणतः चार अवस्था असतात. अंडी पिवळसर रंगाची असतात. अळी सुरवातीला हिरव्या रंगाची असते. नंतर ती तपकिरी रंगाची होते. अंगावर राखाडी किंवा पांढऱ्या रंगाच्या रेषा असतात. कोष हा तपकिरी रंगाचा फळांच्या अवशेषात किंवा जमिनीत आढळतो. पतंग फिकट पिवळसर किंवा फिकट हिरव्या रंगाचा असतो. जीवनक्रम २५-३० दिवसात पूर्ण होतो. ही जवळजवळ १५८ पिकावर उपजीविका करते. उदा टोमॅटो, मिरची, भेंडी, कोबी वर्गीय पीके, वाल आणि घेवडा इत्यादि.

आर्थिक नुकसान पातळी : एक अळीचा पतंग प्रति मीटर रांगेत किंवा २ टक्के नुकसान होते. एक अळी ही २ ते ८ फळांचे नुकसान करू शकते. जवळपास ही कीड ७०-८० टक्के नुकसान करते. टोमॅटो पिकात अळी अवस्थेतील किड शेंड्यांची किंवा रोपांची पाने खाते. नंतर टोमॅटो अपरिपक्व अथवा पक्व किंवा लहान फळांना बीळपाडते. टोमॅटो फळात विष्ठा टाकतात त्यामुळे टोमॅटो फळे खराब होतात, सडतात व त्यावर बुरशीजन्य रोगाची वाढ





होऊन पिकात रोगाची लागण होते.

उपाययोजना : पुनर्लागवड वेळी मुख्य पिकाच्या कडेने मका आणि चवळी लावावी. तसेच झेंडू लावावा. लागवडीनंतर ४०-४५ दिवसांनी शेतात ट्रायकोग्रामा चिलोनिस हे मित्रकीटक १ लाख प्रतिहेक्टर या प्रमाणात ७ दिवसांच्या अंतराने २-३ वेळा सोडावे. हे कीटक फळे पोखरणाऱ्या किडीची अंडी शोधून त्यात स्वतःची अंडी घालतात. परिणामी फळे पोखरणारी कीड अंडी अवस्थेतच नष्ट होते. फळे पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी त्यांना रोगकारक ठरणाऱ्या विषाणू चां वापर करता येतो. हेलीकोव्हर्पा न्यूक्लिअर पॉलिहायड्रॉसीस व्हायरस (एचएएनपीव्ही) १ मिलि प्रतिलिटर पाणी याप्रमाणे उन्हे कमी झाल्यानंतर संध्याकाळी फवारणी करावी. ५ टक्के निंबोळी अर्क किंवा कडूनिंब आधारित ॲझाडिरेक्टीन (३००० पीपीएम) २ मि.लि प्रतिलिटरप्रमाणे फवारणी करावी. बी. टी. जीवाणूजन्य कीटकनाशक २ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणात करावी. शेतात एकरी ५ या प्रमाणात कामगंध सापळे लावावे.

वेळोवेळी किडलेली फळे काढून खोल खड्ड्यात गाडून टाकावीत.

रासायनिक नियंत्रण : १. क्लोरएन्ट्रानिलिप्रोल १८.५ एससी -०.३ मिली (कोराजन, एफएमसी)

२. सायान्ट्रानिलीप्रोल १०.२६% ओडी - १.८ मिलि (बेनेव्हीया, एफएमसी)

३. फ्लुबेन्डामाइड २०% डब्ल्यूडीजी - ०.५ ग्राम (टाकुमी, टाटा)

४. इंडोक्झाकार्ब १४.५% एससी - ०.८ मिलि (किंगडोक्सा,घरडा केमिकल्स)

५. क्विनालफॉस २५ ईसी - २ मिलि (धानुलक्स, धानुका)

या पैकी कोणतेही कीडनाशक आलटून पालटून किडीचा प्रादुर्भाव अनुसार प्रति १५ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी :

रसशोषक किडींचा उद्रेक टाळणे, किडींमध्ये कीटकनाशकांप्रती प्रतिकारक क्षमता वाढीस लागू नये, तसेच फवारणी करणाऱ्या व्यक्तीस विषबाधा होऊ नये, इ. साठी खालील बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे. पीक वाढीच्या सुरुवातीच्या ६० दिवसांपर्यंत रासायनिक कीटकनाशकांचा वापर करू नये.

एकाच वेळी एकापेक्षा अधिक कीटकनाशकांचे मिश्रण करून फवारू नये.

त्वचेला हानी, इजा होऊ नये म्हणून कीटकनाशके उघड्या हाताने हाताळू नयेत. हात मोज्यांचा वापर करावा. श्वासाद्वारे शरीरात जाऊन विषबाधा होऊ नये यासाठी फवारणी करताना नाक आणि तोंडाला मास्क लावावा.

फवारणीचे तुषार/शिंतोडे डोळ्यात गेल्यास गंभीर इजा होऊन दृष्टी जाऊ शकते. त्यामुळे डोळ्यांना गॉगल किंवा संरक्षक हूड लावावे. विषबाधेची लक्षणे दिसताच त्वरित उपचार करून घ्यावेत.




### महत्वाच्या घटना

१७६१ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव हे मराठा साम्राज्यातील ४ थे पेशवे बनले.
१८६६ : आयर्लंडच्या व्हॅलेन्शिया द्वीपापासून कॅनडातील ट्रिनिटी बेपर्यंत समुद्राखालील तार घालण्याचे काम पूर्ण. युरोप अमेरिकेच्या दरम्यान तारसंदेश पाठवणे शक्य झाले.
१८९० : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉगने स्वत:वर गोळी झाडुन घेतली. दोन दिवसांनी त्याचे निधन झाले.
१८९७ : बाळ गंगाधर टिळक यांना पहिल्यांदा कैद करण्यात आलं.
१९२१ : रक्तातील साखरेवर 'इन्सुलिन' या संप्रेरकाचे नियंत्रण असते असे टोरांटो विद्यापीठातील सर फ्रेड्रिक बँटिंग आणि चार्ल्स बेस्ट यांनी सिद्ध केले. तसेच त्यांनी 'इन्सुलिन' शुद्ध स्वरुपात विभक्त करण्यात यश मिळवले.
१९४० : ॲनिमेट शॉर्ट फिल्म ए जंगली हेअर मधून बग्स बनी हे पात्र प्रकाशित झाले.
१९४९ : पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललँड कॉमेटचे पहिले उड्डाण.
१९५५ : दोस्त राष्ट्रांनी ऑस्ट्रियातुन आपले सैन्य काढुन घेतले.
१९८३ : कोलंबो येथील वेलिकाडा तुरुंगात सिंहली कैद्यांनी १८ तामिळ राजकीय कैद्यांची हत्या केली.
१९८७ : पुरातत्व विभागाच्या संशोधकांना टायटॅनिक जहाजाचा मलबा सापडला.
१९९७ : तामिळनाडुचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. करुणानिधी यांची सलग सातव्यांदा पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा एक विक्रम आहे.
१९९९ : द्रवखनिज तेलवायूचा वाहनांसाठी इंधन म्हणून वापर करण्याचा प्रस्ताव पेट्रोलिअम मंत्रालयाने मंजूर केला.
२००१ : सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, सार्वजनिक वाहने या ठिकाणी सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवनावर व थुंकण्यावर तसेच या वस्तूंची सार्वजनिक ठिकाणी जाहिरात करण्यावर बंदी घालण्याचा महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा निर्णय
२०१२ : लंडन येथे ३० व्या येथे ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६७ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १७४८)
१७२४ : राजस्थान मधील मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रतापसिंह द्वितीय यांचा जन्मदिन.
१८९९ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू पर्सी हॉर्नी ब्रूक यांचा जन्म.
१९११ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (मृत्यू: २८ जानेवारी १९९७)
१९१३ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यकर्त्या कल्पना दत्त यांचा जन्मदिन.
१९१५ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू जॅक आयव्हरसन यांचा जन्म.
१९४० : भारतीय वंशीय अमेरिकन लेखिका व कादंबरीकार भारती मुखर्जी यांचा जन्मदिन.
१९५० : ग्रामी पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वीणा वादक व्ही. एम. भट्ट यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी जी.एस. बाली यांचा जन्म.
१९५५ : ॲलन बॉर्डर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६३ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू नवेद अंजुम यांचा जन्म.
१९६७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक राहुल बोस यांचा जन्म.
१९६९ : दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू व मुंबई इंडियन संघाचे प्रशिक्षक जोंटी रोड्स यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय फुटबॉल खेळाडू सॉकर वेल्हो यांचा जन्म.
१९९० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कृती सॅनॉन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४४ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ६ सप्टेंबर १७६६)
१८९५ : उस्ताद बंदे अली खाँ बीनकार, किराणा घराण्याचे प्रवर्तक, सूक्ष्म स्वरांचे भान असणारे व मधुर वादन करणारे असा त्यांचा लौकिक होता. पुण्यात नव्या पुलाजवळील दर्ग्याच्या परिसरात उस्ताद बंदे अली खाँ यांची कबर आहे. (जन्म: )
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे निधन.
१९७५ : त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर गांधीवादी नेते, खासदार. भारतीय राज्यघटनेचे मराठीत भाषांतर करुन २६ जानेवारी १९५० रोजीच ते वाचकांच्या हातात देण्याचे काम त्यांनी केले. (जन्म:)
१९८० : मोहम्मद रझा पेहलवी इराण देशाचे शेवटचे शासक व शाह ऑफ इराण म्हणून प्रसिद्ध (जन्म: २६ आक्टोबर १९१९)
१९९२ : अमजद खान हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (जन्म: १२ नोव्हेंबर १९४० गझनी, अफगाणिस्तान)
१९९७ : बळवंत लक्ष्मण वष्ट हिंदुत्ववादी कार्यकर्ते
२००२ : कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (जन्म: २८ फेब्रुवारी १९२७)
२००७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (जन्म: ३० जानेवारी १९१७)
२०१५ : भारताचे ११ वे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १९३१). भारतीय सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, तसचं, पद्मभूषण व पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित ''मिसाईल मॅन'' म्हणून प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक व माजी भारतीय राष्ट्रपती

# कंत्राटदार व प्रशासकांच्या धोरणाने सफाई कामगारांवर उपासमारीची वेळ

माजलगाव । प्रतिनिधी

शहराला ज्यांच्यामुळे पाच कोटी रुपयांची बक्षीसे मिळाली कंत्राटी सफाई कामगार घंटागाडीवाले दररोज सकाळी उठून शहरातील गल्ली बोळात व घरोघरी जाऊन स्वच्छतेची सेवा बजावत असतात, या सफाई कामगारांच्या जीवावरच नगर परिषदेला राज्य शासनाचे पाच कोटींचे स्वच्छतेचे पारितोषिक मिळाले. या गोष्टीचा जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात डंका वाजविण्यात आला, परंतु ज्यांच्या जीवावर हे बक्षीस मिळाले त्या सफाई कामगारांना गेल्या तीन महिन्यांपासून वेतन अदा करण्यात आले नाही त्याच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली आहे. सफाई कामगारांनी आपल्या श्रमाच्या व हक्काच्या पगारासाठी केलेल्या कामबंद आंदोलनामुळे घरा-घरात अस्वच्छता निर्माण झाली असून शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव होऊन रोगराईची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. जिल्हाधिका-यांनी याकडे गांभीयनि लक्ष देऊन सफाई कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी होत आहे. शहरात साफसफाई करण्यासाठी साफसफाईसाठी घंटागाड्या, इधन गाड्धा (छोटा हत्ती) आणि ट्रॅक्टर असून दररोज दिवस उगवताच महिला व पुरुष मिळून सफाई कामगार व घंटागाडीबाले शहराच्या सर्व प्रभागातील गल्ली-बोळात जाऊन घरा-घरातील ओला व सुखा कचरा जमा करून स्वच्छतेची सेवा बजावतात. एवढेच नव्हे तर घरासमोरील नाल्यांची व रस्त्यांची साफसफाई करून शहर स्वच्छ व सुंदर ठेवतात. या सफाई कामगारांमुळेच नगर परिषदेला स्वच्छते बाबतचा राज्य शासनाचा पाच कोटीं. रुपयाचे पारितोषिक मिळाले.



परंतु ज्यांच्या जीवावर हे बक्षीस मिळाले या सफाई कामगारांना गेल्या चार महिन्यांपासून त्यांचा श्रमाचा हक्काचा मोबदला अदा करण्यात न आल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची दुर्देची वेळ आली आहे. साफसफाईचे कंत्राट असलेल्या तीन महिन्यांचा पगार न दिल्याने या सफाई कामगारांनी सध्याच्या कंत्राटदाराने तीन महिन्यांपासून चे वेतन आदा दिलेले नसल्याने रविवार, दि.२१ जुलै २०२४ पासून कामबंद केले आहे. या घंटागाडी येत नसल्याने शहरातील घरा-घरात कचऱ्याचे ढीग जमा झाल्याने घरातच कचरा डेपो तयार होऊ लागल्याने शहरवासी चिंतग्रस्त झाले असून हा कचरा रस्त्यावर फेकून द्यावा की, नगरपरिषदेत नेऊन जमा करावा, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. ठीक ठिकाणी अस्वच्छता झाल्याने शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे तर नाल्या तुंबल्या आहेत. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव झाल्याने रोगराईची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. आता जिल्हाधिका-यांनी गांभीयनि दखल घेऊन कंत्राटी सफाई कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी होत आहे. माजलगाव शहर स्वच्छ ठेवू सुंदर ठेवू संकल्प , ओला कचरा, सुका कचरा घंटा गाडीत टाकू या, स्वच्छतेचा मंत्र स्वच्छतेचा भारत का इरादा कर लिया हमने, देश से अपने ये वादा कर लिया हमने, हा नारा घंटागाडीतून दिवस उगचताच रोज सकाळी ऐकू यायचा. परंतु सफाई कामगारांचे काम बंद झाल्यापासून हा नारा बंद झाला आहे

## कंत्राटदाराने पगारवाढ करून पीएफचा भरणा करावा

नगर परिषदेकडून कंत्राटदारांना साफसफाई व स्वच्छतेची बिले (देयके) नियमित अदा करण्यात येत नाहीत का? मग आम्हाला आमच्या श्रमाचा व हक्काचा नियमित पगार का देण्यात येत नाही? असा खडा सवाल करत शहरातील सफाई कामगार व घंटागाडीवाल्यांना तीन महिन्यांचा थकीत पगार त्वरित अदा करण्यात यावा, कंत्राटदाराकडून आठ हजार रुपये महिना एवढ्या तुटपुंज्या पगारात सफाई कामगारांच्या कुटुंबीयांच्या रोजी-रोटीचा प्रश्न भागत नाही. त्यामुळे महिला व पुरुष सफाई कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे १७ ते १८ हजार रुपये महिना पगार मिळाला पाहिजे व त्यामधून त्यांचे प्रत्येक महिन्याला पी.एफ. त्यांच्या खात्यावर जमा झाले पाहिजे त्याचप्रमाणे कंत्राटदाराने साफसफाईचे टेंडर घेतल्यापासून पी. एफ. न भरल्याने सफाई कामगारांचे अतोनात नुकसान होत पी. एफ. सफाई कामगारांच्या कामबंद आंदोलनामुळे गेल्या तिन दिवसांपासून माजलगाव शहरात स्वच्छता मोहीम बंद असल्याने घराघरात केर- कचऱ्याचे ढीग जमा झाले असून गटारी तुंबल्या आहेत. तर शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव झाला असून रोगराई होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. घंटागाडी येणे बंद झाल्याने वाढत जाणाऱ्या केर कचऱ्यामुळे घरातच कचरा डेपो निर्माण होऊ लागल्याने नागरिक चिंताग्रस्त झाले असून हा कचरा रस्त्यावर फेकून द्यावा का असा गंभीर प्रश्न शहरवासीयांसमोर उभा राहिला आहे

## थोडक्यात



### मुलींनी निर्भीड होऊन कार्यरत राहावे- परदेशी

बीड : जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे बीडचे पालकमंत्री आदरणीय धनंजयजी मुंडे साहेब व महिला प्रदेशाध्यक्ष आदरणीय रूपाली ताई चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर, महिला जिल्हाध्यक्षा प्रज्ञाताई खोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणिय ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त व गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून रविवारी सरस्वती विद्यालय येथे संविधान वाचन करण्यात आले तसेच पोलीस प्रशासन मुलींबरोबर आहे हे ठामपणे सांगण्यासाठी दामिनी पथकही उपस्थित होते. त्याप्रसंगी महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्याध्यक्ष तसेच म.रा. बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य या नात्याने शालिनी परदेशी यांनी विद्यार्थ्यांनीना बहुमोल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे न भिता पोलीस प्रशासन आपल्या समवेत आहे याविषयी दामिनी पथकाच्या जाधवताई यांनी मार्गदर्शन केले. आदरणीय दादांना दीर्घायुष्य लाभो यासाठी सर्वांनी प्रार्थना केली. त्याप्रसंगी पोलीस प्रशासन, प्राचार्य श्री उघाडे सर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्ष शालिनीताई परदेशी, जिल्हा सचिव अनुराधाताई प्रकाश, सुजाता ताई कांबळे आणि सर्व शिक्षक आणि विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गजानन महाराज पालखीचे उद्या शहरात आगमन

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र शेगाव निवासी श्नीसंत गजानन महाराजांची पालखी पंढरपुरच्या आषाढीवारी सोहळा भक्तीभावाने साजरा करुन शेगावकडे मार्गक्रमण करीत रविवार दि.२८ रोजी सकाळी ठिक ८.०० बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे आगमन होत आहे. बीड शहरात पालखीचे आगमन झाल्यानंतर पालखी शहरातील राजुरी वेस, कारंजा रोड, बलभीम चौक, धोंडीपुरा, माळीवेस, सुभाष रोड, नवा पुल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा मार्गे, बालाजी मंदिर मोंढा रोड, विठ्ठल मंदिर चौक, शुक्रवार पेठ ,काळा हनुमान ठाणा, शनिवार पेठ, रविवार पेठ, खडकपुरामार्गे श्रीक्षेत्र कंकालेश्वर मंदिर येथे मुक्कामी थांबणार असून पालखीचा मुक्काम असताना श्नींचे पुजन, भजन, हरी किर्तन आदींसह विविध धार्मिकविधी संपन्न होत असून बीड शहरातील महिला, पुरुष भावीकभक्तांनी श्रींच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्ती आनंदाचा लाभ घ्यावा असे आवाहन दिंडी व्यवस्थापक गजानन महाराज संस्थान शेगाव, विठ्ठल मंदिर पेठ बीड संस्थानचे मठाधिपती ह.भ.प..श्नी.एकनाथ महाराज पुजारी, मंदिरचे पुजारी संजय गुरव यांनी आवाहन केले आहे.

### डॉ. शिशीर खोसेंचा पुरस्काराने सन्मान

बीड : येथील सौंदर्यशास्त्र, त्वचारोग व केश सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ डॉ. शिशीर खोसे यांचा उत्कृष्ट उदयन्मोख सौंदर्यशास्त्र तज्ज्ञ पुरस्काराने सन्मान करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विविध क्षेत्रातील वैद्यकीय तज्ज्ञांचा गौरव करण्यात आला. अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. नागेश चव्हाण, बालहक्क आयोगाच्या सदस्य व राष्ट्रवादी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ॲड. प्रज्ञा खोसरे, कल्पतरुच्या सचिव डॉ. सारिका क्षीरसागर, युवती आघाडीच्या अध्यक्ष प्रिया डोईफोडे, वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश शिंदे यांच्या हस्ते डॉ. शिशीर खोसे यांचा सन्मानचिन्ह, मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. पद्मांजली स्किन केअर हॉस्पीटलचे डॉ. खोसे यांनी सौंदर्याच्या समस्यांसह कुष्ठरोगांच्या दुर्धर रुग्णांवरही यशस्वी उपचार केले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# रोज झाडाखाली आणि पाऊस आल्यावर गोठ्यात भरते शाळा

## वंजारवाडी वस्तीशाळेला १० वर्षांपासून इमारतच नाही ; शिक्षण विभागाचे दुर्लक्ष

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शाळे अंतर्गत येणाऱ्या वंजारवाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांना गेल्या १० वर्षांपासून इमारतच नाही. वस्तीवरील ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची उभारणी केली होती.दोन महिन्यांपूर्वी झालेल्या वादळवा-यात पत्र्याचे शेड उडुन गेले त्यामुळे आता विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे. मात्र पाऊस आल्यावर गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागत असल्याने वस्तीवरील पालकांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. या शाळेसाठी निदान एका खोलीसाठी निधी देऊन तातडीने बांधकाम करून विद्यार्थ्यांच्या पायाभुत शिक्षणाचा प्रश्न सोडवावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना केली आहे.

वडवणी तालुक्यातील बाहेगव्हाण शिवारात बाहेगव्हाण शाळे अंतर्गत वंजारवाडी वस्ती येथे १० वर्षांपूर्वी जिल्हा परिषद वस्तीशाळेची स्थापना झाली.शाळा स्थापनेनंतर काही दिवसांनी वस्तीवरील ग्रामस्थांनी एकत्र येत वर्गणी गोळा करून शाळेसाठी पत्र्याच्या शेडची खोली बनवली याच पत्र्याच्या शाळेत विद्यार्थी शिक्षण घेत होते.परंतु दोन महिन्यांपूर्वी आलेल्या वादळ वा-यामध्ये पत्र्याचे शेड उडाले.त्यामुळे विद्यार्थ्यांना झाडाखाली बसुन शिक्षण घेण्याची वेळ आली आहे.वंजारवाडी वस्ती येथे इयत्ता १ ते ५ वी



पर्यंतचे वर्ग आहेत.सध्या विद्यार्थी पटसंख्या २३ असुन दोन शिक्षक कार्यरत आहेत.शाळेच्या स्थापनेपासून इमारतीची मागणी होत असताना देखील अद्याप शाळेला ईमारत मिळाली नाही.त्यामुळे विद्यार्थ्यांना कधी झाडाखाली तर कधी गोठ्यात बसुन शिक्षण घ्यावे लागत आहे.शिक्षण विभाग आणखीन किती दिवस या शाळेकडे दुर्लक्ष करणार आहे. असा संतप्त सवाल वंजारवाडी वस्तीवरील विद्यार्थ्यांचे पालक करत आहेत. जोरदार वारा आणि पाऊस आल्यावर विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे पालकांची शाळा इमारतीची मागणी आहे.

**शिक्षण विभागाचे दुर्लक्ष**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेसाठी ईमारत , शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, डिजिटल शिक्षणासाठी विज आदि.मुलभूत सुविधा नाहीत.इमारत नसल्याने शाळेचे शैक्षणिक रेकॉर्ड तसेच विद्यार्थ्यांसाठी मधल्या सुट्टीमध्ये मिळणाऱ्या पोषण आहाराचे साहित्य ठेवण्यास अडचणीत महत्त्वाचे कागदपत्र आणि साहित्य ठेवण्याचे अडचणी आहेत.शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही भौतिक सुविधा नाहीत.याकडे वारंवार निवेदन तसेच आंदोलनाद्वारे शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून सुद्धा शिक्षण विभागाकडून उपाययोजना होताना दिसत नाहीत.एकदरीतच शिक्षण विभागाला याचे गांभीर्य दिसून येत नाही.

# वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या डॉक्टराचा सन्मान



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान सोहळा संपन्न झाला.राष्ट्रवादी युवती काँग्रेस च्या बीड जिल्हाध्यक्षा प्रिया डोईफोडे यांच्या वतीने कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शहरातील राष्ट्रवादी कार्यालय येथे दि.२१ जुलै रोजी वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अनेक डॉक्टरांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या डॉक्टरांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला उत्कृष्ट डॉक्टर म्हणून डॉ.शिशिर खोसे (त्वचारोग तज्ञ), डॉ.संदीप येवले (एम. डी. मेडिसिन) डॉ.अर्चना धूत (स्त्रीरोग तज्ञ)डॉ. हनुमंत पारखे (बालरोग तज्ञ) डॉ. महेंद्र गौशाल (एम.डी. होमिओपॅथी अँड एम.बी.ए. हेल्थ केअर) डॉ.पप्पू भिसे (पशुवैद्यकीय) या सर्व डॉक्टर आपल्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत आहेत.यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. सारिकाताई क्षीरसागर तर प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश चव्हाण सर, राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष व राज्य बालहक्क आयोगाच्या सदस्या ॲड. प्रज्ञाताई खोसरे, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. रमेश शिंदे यांच्यासह राष्ट्रवादीच्या सर्व युवती पदाधिकारी तसेच पक्षातील पदाधिकारी, महिला पदाधिकारी, युवक, युवती उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.सुतार सर, प्रास्ताविक आयोजक प्रिया डोईफोडे तर आभार प्रदर्शन शालिनी परदेसी यांनी व्यक्त केले.

# मूकबधिर व अस्थिव्यंग शाळा नेकनूर येथे खाऊ वाटप

आज दिनांक २६ जुलै रोजी माननीय आमदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मूकबधिर निवासी शाळा नेकनूर व अस्थियग शाळा येथील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी नेकनुरचे ज्येष्ठ नेते शोयब आमदार तसेच सतीश मुळे मामा, बिभीषण नन्नवरे,मतीन भाई,प्रशांत हावळे हे उपस्थित होते. या सर्वांनी आ. नमिता ताई मुंदडा यांच्या आदेशान्वये सामाजिक कार्यकर्ते सतीश मुळे मामा यांच्या नेतृत्वाखाली या नेकनुर येथील भाजप कार्यकर्त्यांनी मूकबधिर व



अस्थिव्यंग असलेल्या विद्यार्थ्यांना बिस्किट चक्की आणि चिप्स चे पुडे वाटून आपला आनंद द्विगुणीत केला या कार्यक्रमासाठी अस्थिव्यंग शाळेचे मुख्याध्यापक श्री भोंडवे सर तर मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक लुचारे सर हे उपस्थित होते त्याचबरोबर शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती सदरील कार्यक्रम हा अगदी खेळीमेळीचे वातावरणामध्ये पार पडला.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात 'ग्रीन क्लब' स्थापन

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २५ जुलै रोजी ग्रीन क्लबची स्थापना उत्साहात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान अभ्यासशाखेचे माजी अधिष्ठाता प्रोफेसर भालचंद्र वायकर, प्रमुख अतिथी म्हणून प्रो. गुलाबराव खेडकर, प्रो. रमेशराव चौंडेकर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी ग्रीन क्लबचे अध्यक्ष कु. श्रध्दा देशमुख, उपाध्यक्ष कु. प्राची खंडागळे, संजय मिसाळ, क्लबचे समन्वयक प्रो. महादेव काळे




यांच्यासह उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक प्रो. गणेश पाचकोरे आदि उपस्थित होते. ग्रीन क्लबच्या स्थापनेचा उद्देश स्पष्ट करताना प्राचार्य हांगे म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल ठेवण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, जलसंवर्धन व जल आणि घनकचरा व्यवस्थापन, ऊर्जेचा काळजीपूर्वक वापर, जैवविविधतेचे संवर्धन करणे अत्यावश्यक आहे. ग्रीन क्लबच्या माध्यमातून असे सर्व उपक्रम राबवण्यात येणार आहेत. उद्घाटनानंतर महाविद्यालय परिसरात मान्यवरांच्या हस्ते तुळस, जास्वंद ई. रोपटी लावण्यात आली. आभार ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत यांनी मानले.

# शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा या राष्ट्रीय मार्गाचे काम तीन महिन्यात पुर्ण होणार

## साकेतच्या गुत्तेदाराशी जयदत्त क्षीरसागरांची चर्चा

बीड । प्रतिनिधी

शिरापुर धुमाळ ते जरूड फाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असुन हे काम सध्या ४० टक्के झाले आहे. उर्वरित काम ३ महिन्यात पुर्ण करण्याचे नियोजन असुन या कामात महावितरणचे पोलशिप्टींग,नवीन विद्युत लाईन टाकण्याचे काम सुरू असुन बीड शहरात काही भागात रस्त्यालगत नळ योजनेचे पाईप स्थलांतरीत करण्याचे काम होत आहे. शहरातून जाणारा हा रस्ता लवकर पुर्ण करण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करत असल्याचे साकेत कन्स्ट्रक्शनच्या गुत्तेदारांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याशी बोलताना सांगितले आहे.

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दोन दिवसापुर्वीच रस्त्यावर काम करणार्या साकेत कन्स्ट्रक्शनच्या गुत्तेदाराशी चर्चा केली. सध्या शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या कामामुळे शहरातील व ग्रामीण भागातील नागरीकांना वाहतूकीस त्रास सहन करावा लागत आहे.हा रस्ता मुख्य रहदारीचा आहे.सध्या याचे काम ४० टक्के झाले आहे. ऐन पावसाळ्यात देखील हे काम सुरू आहे.त्यामुळे नागरिकांना वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ लागला आहे,शिरापुर धुमाळ ते जरूडफाटा हा फोर लाईन सिमेंट रस्ता असुन दोन्ही बाजूनी नाल्यासहीत काम होणार आहे.मात्र अजुनही ६० टक्के काम बाकी आहे. माजी मंत्री क्षीरसागर यांनी साकेतचे गुत्तेदार यांच्याशी संपर्क साधुन हे काम लवकरात लवकर पुर्ण करावे अशा सुचना दिल्या. त्यानुसार येत्या तीन महिन्यात हे काम पुर्ण करू असे आश्वासन दिले आहे. २४ किलोमिटर लांबीचा हा रस्ता असुन यात ६ पुलाची कामे असुन १६० कोटींचा हा रस्ता आहे. बीड शहरातून जाणार्या रस्त्याच्या लांबीत सहा किलोमिटर रस्ता काम होणार आहे. चौपदरी होणार्या या रस्त्यामुळे बीडचा हा भाग शहराच्या वैभवात भर घालणारा ठरणार आहे.तीन महिन्यात म्हणजे दिवाळीपुर्वीच या रस्त्याचे काम होणार असुन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे यासाठी पाठपुरावा करत आहेत.


## जाहिरनामा

क्रमांक. २०२४/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-२७५/१७०

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार धारूर**

दिनांक. ०३/०७/२०२४

जन्म-मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये सर्व जनतेस मौजे, तांदळवाडी ता. धारुर जि. बीड यांना जाहिर केले जाते की, अर्जदार नामे श्री. लक्ष्मण पिता राजेभाऊ पवार रा. तांदळवाडी ता. धारुर जि. बीड यांचा मुलगा नामे दैविक पिता लक्ष्मण पवार यांचा जन्म दिनांक ०१/१२/२०१८ रोजी मौजे तांदळवाडी ता. धारुर जि. बीड येथे झाला असुन अर्जदारांनी सदरहू जन्माची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराच्या मुलाचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासुन १५ दिवसांच्या आत त्याने हया कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार हयांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू अर्जदारांचे जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. **आज दिनांक. ०३/०७/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.**

प्रतः- १. ग्रामसेवक ग्रामपंचायत, तांदळवाडी ता. धारूर जि. बीड २. तहसील कार्यालय धारुर यांचे नोटिस बोडीवर डकवुन पंचनामा सादर करण्यात यावा ३. श्री. लक्ष्मण पिता राजेभाऊ पवार रा. तांदळवाडी ता. धारूर जि. बीड

आदेशावरून
स्वाक्षरित
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, धारूर**

# बीडमध्ये तायक्कांदो खेळासाठी स्वतंत्र हॉल उभारू - डॉ. योगेश क्षीरसागर

## राज्यस्तरीय स्पर्धेचे थाटात उद्‌घाटन, ४५० खेळाडूंचा सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

शहरामध्ये तायक्कांदोला चांगले वातावरण असून, या आधुनिक खेळासाठी बीड शरामध्ये तायक्कांदोसाठी स्वतंत्र हॉल उभारण्याचासाठी नक्कीच प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केले.

शहरातील क्रीडा संकुल येथील इनडोअर हॉल मध्ये ३४ व्या महाराष्ट्र राज्य जुनिअर तायक्कांदो स्पर्धेचे थाटात करण्यात आले. या स्पर्धेचे दीप प्रज्वलन डॉ योगेशजी क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. राज्य संघटनेचे महासचिव मिलिंद पठारे, अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, कोषाध्यक्ष वेंकटेश कररा यांनी ही दीप प्रज्वलन केले. यावेळी पोलिस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ उपस्थित







होते. या वेळी बोलताना डॉ योगेश क्षीरसागर म्हणाले, तायक्कांदो खेळा बद्दल वेगळे आर्कषण निर्माण झाले आहे. या खेळामुळे शारीरिक क्षमताही वाढ होते. डॉ अविनाश बारगजे हे ३० वर्षापासून शहरात तायक्कांदोचे प्रशिक्षण देत आहेत. त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू घडविले आहेत. नितीन कोटेचा यांच्या मागणी प्रमाणे शहरात तायक्कांदोसाठी अत्याधुनिक हॉल उभारण्याचा विचार असून त्यासाठी नक्कीच मी प्रयत्न करेन, असे ही क्षीरसागर म्हणाले.

नितीन कोटेचा म्हणाले, बीड शहरात अनेक खेळांना योगेशदादांनी दिला आहे. तसेच, तायक्कांदोच्या राज्य स्पर्धेसाठी हॉलच्या दुरुस्तीसाठीही त्यांनी मदत केली. त्याच प्रमाणे एक अत्याधुनिक हॉलही त्यांनी द्यावा अशी मागणी यानिमित्ताने मी करतो, या मागणीचा योगेशदादा नक्कीच विचार करतील, असे कोटेचा म्हाणाले. आरटीओ अधिकारी स्वप्नील माने म्हणाले, आजचा दिवस अभिमानास्पद असाच आहे, कारण बीडमध्ये राज्य स्पर्धा होत आहे. शहरातून अनेक खेळाडू घडलेले आहेत. परंतु, इतर जिल्ह्यातील खेळाडूंचा खेळ पाहण्याची संधी बीडकरांना मिळाली आहे. इथे आलेले खेळाडू भविष्यात देशाचे प्रतिनिधीत्त्व करतील यात शंका नाही. आता, खेळ हा एक शिक्षणाचा भाग बनला आहे. अनेक पालक आपल्या मुलांना खेळाकडे वळाले आहेत. खेळालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. यावेळी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नितिनचंद्र कोटेचा, राज्य संघटनेचे महासचिव मिलिंद पठारे, खजीनदार व्यंकटेश कर्रा, शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रवीण बोरसे, उपाध्यक्ष दुलिचंद मेश्राम, राजेश महाजन, विनायक ऐनापुरे, जयश्री बारगजे प्रा. तानाजी आगळे, संतोष बारगजे, डॉ विनोद पवार आदी व्यायसपीठावर उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार –

बीडचे आंतरराष्ट्रीय खेळाडू अविनाश पांचाळ, सचिन जायभाये, राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेला खेळाडू श्रवण तांबारे यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. बहारदार सांस्कृतीक कार्यक्रम सादर स्पर्धेच्या उद्घाटनानंतर ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भरतनाट्यमचे बहारदार नृत्य सादर केले, तसेच गणेश वंदनाचे नृत्य सादर करून उपस्थितांचे वाहवाह मिळविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद शिवनीकर, प्रास्ताविक डॉ. अविनाश बागरजे यांनी केले. डॉ शकील शेख यांनी आभार मानले.

# मराठवाडा नागरी सहकारी पतसंस्थेत ३३ लाखाचा गैरव्यवहार

## अध्यक्ष, सचिवासह संचालक मंडळाविरोधात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

बदनापूर येथील मराठवाडा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत या संस्थेत ३३ लाख ८८ हजार ३२९ रुपयांच्या गैव्यवहारा प्रकरणी अध्यक्ष, सचिवांसह संचालक मंडळावर आज बदनापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बदनापूर येथील मराठवाडा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बदनापूर ता. बदनापूर जि जालना या संस्थेत झालेल्या रक्कम ३३ लाख ८८ हजार ३२९ रुपयांचा गैरव्यवहाराबद्दल पतसंस्थेतील अध्यक्ष व सचिवासह संचालक मंडळावर गुन्हे दाखल करण्यात आले. सदर संस्था ही लेखापरिक्षणासाठी प्रमाणित लेखापरिक्षक दादासाहेब भानुदास ठोंबरे यांचेकडे होती. त्यांनी मराठवाडा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बदनापूर या संस्थेचे १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण करून ११ मार्च २०२४ रोजी सहाय्यक निबंधक डी. एच. बेरा यांनी बदनापूर कार्यालयास लेखापरिक्षण अहवाल सादर केला. सदर लेखापरिक्षणात निदर्शनास आलेल्या अपहाराबाबत विर्निदिष्ठ अहवाल संबधित सहाय्यक निबंधक कार्यालय बदनापूर कार्यालयास सादर केला. सदर अहवालावर सहाय्यक निबंधक, बदनापूर यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम ८१ (५) (ब) अन्वये अपहार करणार्या व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्याबाबत लेखी आदेश भानुदास ठोंबरे प्रमाणित लेखापरिक्षकाला देण्यात आले. त्यानुषंगाने वरीलप्रमाणे गुन्हयाची नोंद करण्यात आली. ठेवीदाराचे हिताच्या दृष्टीने सहकार विभागाव्दारे नागरी पतसहकारी संस्थांच्या बाबतीत विशेष मोहीम सुरु केलेली आहे. त्यानुषंगाने विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन) छ. संभाजीनगरचे शरद जरे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरिक्षण) यु.बी. भोसले, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालनाचे पी. बी. वरखडे, जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग–१, सहकारी संस्था, जालनाचे डी. एच. चव्हाण व बदनापूर सहकारी संस्था सहायक निबंधक पी. एच. बेरा यांच्या मार्गदर्शनाखाली बदनापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला.

# राजयोगीनी सुलभा दीदींच्या स्मरणार्थ कमान आणि स्तंभ उभारणार –आ.कैलास गोरंट्याल

**जालना । प्रतिनिधी**

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय जालन्याच्या संस्थापिका सेवाभावी, तपस्वी ,त्यागमूर्ती असलेल्या ब्रम्हकुमारी राजयोगिनी स्व. सुलभा दीदी यांचे ईश्वरीय,मानवतावादी कार्य आपण जवळून पाहिले असून त्यांच्या कार्यात योगदान देण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. दीदींच्या स्मृती कायम लक्षात रहाव्यात याकरिता मुख्य रस्त्यावर कमान उभारणार असून सिव्हिल क्लब परिसरात स्तंभ उभारणीस पुरेपूर प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आ. कैलास गोरंट्याल यांनी आज दिली.



मंठा चौफुली परिसरातील ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या केंद्रात शुक्रवारी ( ता. २६) राजयोगिनी सुलभा दीदी यांचा प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बुऱ्हानपूर उपविभागाचा प्रमुख मंगलादीदी,आ.कैलास गोरंट्याल, प्रेरणा दायी वक्ते ओंकार भाई, अलका दीदी (कल्याण),,उपविभाग व्यवस्थापिका शीलादीदी (छ.संभाजी नगर ),रमेशभाई,( बांधकाम विभाग प्रमुख आबुरोड), डॉ. उज्वल कापडणीस, ( मालेगाव) , प्रा. जगन्नाथ पाठक,( छत्रपती संभाजी नगर) ,गीता दीदी( मलकापुर), पद्मादीदी (वरणगाव) ,छायादीदी,( सिल्लोड), अर्चनादीदी(परभणी) ,स्नेहादीदी( छ.संभाजी नगर) यांची उपस्थिती होती.

मंगलादीदी यांनी आठवणींना उजाळा देताना गंभीर, रमणीय ,सद्‌गुणांचे विशेषणे असलेल्या सुलभा दीदी मोठ्यांच्या शब्दांचे पालन करून प्रत्येक सेवेत नाविन्यता आणायच्या अनेक भाऊ– बहिणींना त्यांनी प्रेमाची अनुभूती दिल्यानेच इथे भक्तीची बाग फुलून आली असे मंगला दीदी यांनी नमूद केले.

# अक्षय डिजिटलच्या नवीन सेटअपचा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स मध्ये असलेल्या अक्षय डिजिटल फोटो स्टुडिओच्या नवीन सेटअप चा उद्घाटन समारंभ माजी आमदार प्रा. सुनील धांडे त्यांच्या सुविद्य पत्नी सौ स्मीता धांडे ,अक्षय डिजिटल चे मालक शंकर सुरवसे व त्याच्या सुविद्य पत्नीसौ.सुनिता सुरवसे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी पूर्ण सेटअप लावण्यात आला होता.



बीड शहरातील सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स भागातील अक्षय डिजिटल फोटो स्टुडिओच्या माध्यमातून बीड शहरांमध्ये न्यू कर्व्ह लेड वॉल ३ि चा सेटअप दिल्ली येथून बीड जिल्ह्यातील विविध कार्यक्रमासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे .शुक्रवार दिनांक ६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता या सेटअपचे उद्घाटन माजी आमदार प्रा. सुनील धांडे त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. स्मिता धांडे,या स्टुडीओचे संचालक शंकर सुरवसे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.सुनिता सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले .या कार्यक्रमाला बीड शहरातील सर्व फोटोग्राफर, मित्रपरिवार, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा रस्त्याच्या मध्यभागी घ्यावा

## ..अन्यथा उपोषणाचा यशवंत खंडागळे यांचा ईशारा

**आष्टी । प्रतिनिधी**

साबलखेड –कडा–आष्टी ते चिंचपूर या राज्य महामार्गाचे सध्या रस्त्याचे काम सुरु आहे.आमची अनेक दिवसांची मागाणी आहे की,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कडा येथे असलेला पुतळा रस्त्याच्या मध्यभागी घेण्यात यावा.याबाबत यापूर्वी देखील शासन, प्रशासनाकडे निवेदन दिलेले आहेत.सध्या कडा येथे रस्ता काम सुरु असुन होणा–या रस्त्याच्या मध्यभागी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात यावा.ही आम्हां समाज बांधवाची मागणी आहे.अनेक वर्षाची मागणी आहे. या मागणीचा सहानुभुतीपुर्वक विचार करून पुतळा चौकात लातुर,संभाजीनगर धर्तीवर मध्यभागी बसवण्याबाबत संबधीतांना योग्य ते आदेश व्हावेत नसता दि.३० जुलैपासुन आष्टी तहसिल कार्यालयासमोर बेमुदत अमरण उपोषण सुरू करण्याचा ईशारा डा.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे यांनी लेखी निवेदनाव्दारे आष्टीचे तहसिदारांना दिला आहे.

# कारगिल विजय दिन व शहिदांना अभिवादन

**परळी । प्रतिनिधी**

कारगिल विजय दिन आणि या युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना परळी येथील



छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे माजी सैनिकांनी अभिवादन करत हा दिवस साजरा केला.या प्रसंगी निवृत्त सैनिक यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

सण १९९९ मध्ये लडाखमधील उत्तर कारगिल जिल्ह्यातील पर्वत शिखरांवर पाकिस्तानी सैन्याला हुसकावून लावत या युद्धात भारताचा विजय मिळविला होता.या युद्धात अनेक भारतीय सैन्य शहीद देखील झाले होते.

कारगिल युद्धातील वीरांच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. सैन्य दलात काम करून देश सेवा केलेल्या माजी सैनिकांनी शुक्रवार दि २६ रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र येत कारगिल विजय दिन आणि या युद्धात शहीद झालेल्या वीर जवानांना अभिवादन केले.यावेळी सैन्य दलातून निवृत्त झालेले सुबेदार संजीवन आघाव, माजी सैनिक भरतराव गित्ते, भगवान यादव, अमरनाथ मुंडे व्यंकट मुंडे यांच्यासह अनेक माजी सैनीक व सर्वसामान्य परळीकर उपस्थित होते

# आष्टीच्या एमआयडीसीची निविदा निघाली

## सुरेश धस यांच्या पाठपुराला यश

**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या आष्टी फेज २ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) सर्वेक्षणाची निविदा निघाली असून माजी मंत्री सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.त्यामुळे आष्टीच्या एमआयडीसीचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

याबाबत सहा महिन्यापूर्वी आष्टी फेज २ साठी मंजुरी मिळावी या साठी सुरेश धस यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यावेळी शासनाने सकारात्मक प्रतिसाद देऊन उपमुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ श्रीमती मुळे व प्रादेशिक अधिकारी औरंगाबाद विभागाचे चेतन गिरासे यांनी आष्टी शहरानजिक जागेची पाहणी केली.



आणि सदरील ५० हेक्टर जागा एमआयडीसी साठी योग्य असल्याचे सांगत सदर प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. गुरुवार दि २५ जुलै रोजी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या उच्चाधिकार समितीने या प्रस्तावास मान्यता दिली असून लवकरच सर्व सुविधांनी युक्त असे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आष्टी फेज २ (एमआयडीसी) कार्यान्वित होणार असून फेज १ मधील एमआयडीसी मधील रस्ते,पाणी, तसेच सर्व सुविधा उपलब्ध होणार आहेत.त्यामुळे आष्टी तालुका वासियांचे अनेक वर्षांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.तालुक्यातील नवउद्योजकांना या एमआयडीसी मध्ये जागा उपलब्ध होणार आहे.व या माध्यमातून युवकांना रोजगार मिळन्यास वाव मिळणार आहे.तसेच तालुक्याच्या विकासाला गती प्राप्त होणार आहे.या निर्णयाचे सुरेश धस यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांचे जाहीर आभार मानले आहेत.

# नळ कनेक्शन अर्धवट राहीलेले काम पूर्ण करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील सरस्वती माता मंदिर खरपुडी रोड, वरील अंबादास नगर, सहयोग नगर, सुर्या पार्क, प्रभातनगर, येथील नवीन वस्ती निर्माण झाली आहे. तरी या नवीन गणेशनगर, वरदनगर, सहयोग अस्तित्वात आलेल्या वसाहतीमध्ये नळ, पाणी, पाईप लाईनचे अर्थचट राहीलेले काम पूर्ण करून देण्यात यावे. पाण्या अभावी या विभागातील रहिवास्यांना खुप त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे आपण जालना शहर महानगरपालिकेला सुचना देवून



संबंधीत पाणी पुरवठा विभागातील कर्मचा–यांना आदेशीत करून वरील सर्व मागण्या तात्काळ सोडवाव्यात, आणि विशेष लक्ष देवून आमच्या वरिल सर्व मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात. जर १५ दिवसाच्या आत वरील समस्याचे निवारण झाले नाही तर जालना पैलेस हॉटेल येथील नांदेड छ. संभाजीनगर हायवे रोडवर रास्ता रोको आंदोलन दि.१५ ऑगस्ट रोजी छेडण्यात येईल. मग होणा–या परिणामाची जवाबदारी महानगरपालिकेची राहील याची कृपया नोंद घ्यावी. असे निवेदन महानगर पालिकेचे चे आयुक्त संतोष खांडेकर यांना प्रशासक अधिकारी विजय फुलंब्रीकर यांना देण्यात आले आहे. यावेळी परिसरातील महिला मीरा त्रिवेदी, रूपा रुमालवार, कोकिळा फुलझाडे, रंजिता एकलदेव,सपना साबळे, अश्विनी पेंटी, आराधना आव्हाड, शांतबाई कुसुमवाड, कल्पना श्रीरामवार, मथुराबाई जोगदंड,छाया गंगावणे, अनिता भसाडे,आकाश श्रीरामवार, किशोर कर्रे, राहुल श्रीरामवार, प्रवीण पेंटी, गोपाल त्रिवेदी, आकाश आव्हाड, आदींच्या निवेदनावर सह्या आहेत.

# दोन चोरट्याकडून १६ मोटरसायकली जप्त,स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये मोटरसायकल चोरीचा प्रमाणात वाढ झाली होती. दुचाकी चोरांचा शोध घेवून कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल , अपर पोलीस अधिक्षक यानी स्थानिक गुन्हे शाखेस सुचना दिल्या वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रामेश्वर खनाळ यांनी दुचाकी चोरांसाठी विशेष पथक तयार करुन दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या,

जालना शहरामध्ये सय्यद अल्ताफ सय्यद अहमद, वय–२१ वर्ष, रा. नॅशनलनगर, जालना हा त्याच्या साथीदारांसोबत मोटार सायकल चोरी करीत असलेबाबत गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाल्याने त्याचा विशाल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर रोड, जालना येथे शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली व गुन्हा करण्यासाठी त्याचा मित्र महंमद फिरोज ऊर्फ बब्बो कलीमोडीन, वय– १९ वर्ष, रा. कुचरवटा, जालना व एक विधीसंघर्षग्रस्त बालक अशांनी मिळुन जालना शहरातील मोटारसायकल चोरी केल्याचे सांगितले, त्यानुसार महंमद फिरोज ऊर्फ बब्बी कलीमोद्दीन, व एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी केली असता गुन्हयातील विधी संघर्षग्रस्त



बालकाने जालना शहरातील विविध ठिकाणाहुन मोटार सायकल चोरी करुन आरोपी सय्यद अल्ताफ सय्यद अहमद व महंमद फिरोज ऊर्फ बब्बी कलीमोद्दीन यांना विक्रीकामी आणुन दिल्या व सदरच्या मोटार सायकली फायनान्स कंपनीने ओढुन आणलेल्या असल्याचे भासवुन जालना शहरातील नागरीकांना मोटार सायकल विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे ज्यांना मोटार सायकल विक्री केल्या त्या इसमांकडुन १६ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या आहेत.आरोपीतांनी वरील १६ मोटार सायकल हया सदर बाजार, चंदनझिरा, कदीम जालना, तालुका जालना व हसनाबाद पोलीस ठाणे हददीतुन चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रामेश्वर खनाळ, पोनि, श्री. सय्यद मजहर, सपोनि, योगेश उवाळे, सपोनि, शांतीलाल चव्हाण, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, कृष्णा तंगे, सुधीर वाघमारे, सागर बाविस्कर, प्रशांत लोखंडे, सतिष श्रीवास, अक्रूर धांडगे, धीरज भोसले सर्व स्थागुशा, जालना यांनी केली आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष



# केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी घेतला जिल्ह्यातील पूर परिस्थितीचा आढावा

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि पुरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन बाधित नागरिकांना तात्काळ मदत करावी, आपत्तीच्या काळात सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कामे करावीत,असे निर्देश केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

शासकीय विश्रामगृह येथे जिल्ह्यातील पूर परिस्थितीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पुणे मनपा आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, पीएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, जलसंपदा विभागाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, पाटबंधारे विभागाचे मुख्य अभियंता हनुमंत गुणाले, महावितरणचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार आदी उपस्थित होते.

श्री. मोहोळ म्हणाले, जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून पुरबाधित क्षेत्रातील स्थलांतरीत नागरिकांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात. या भागात स्वच्छता करण्यासोबतच नागरिकांना अन्न, स्वच्छ पाणी देण्याची सोय करावी. नागरिकांची आरोग्य तपासणी करावी, रोगराई नियंत्रणासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. याकरीता पुरेसे मनुष्यबळ वाढवावे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरीता पुराच्या पाण्यात खराब झालेले किंवा वाहून गेलेले दाखले उपलब्ध करून द्यावेत.

धरणातील पाण्याचा विसर्गामुळे नागरिकांची गैरसोय टाळण्याकरीता विसर्ग



करण्यापूर्वी जलसंपदा विभागाने जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, महसूल, महानगरपालिका, पोलीस प्रशासन तसेच स्थानिक यंत्रणांना कळवावे, जेणेकरुन त्या सूचना नागरिकांपर्यंत पोहचविण्यास मदत होईल. नदीपात्रावरील गावातील नागरिकांना स्थानिक यंत्रणेच्या माध्यमातून धरणातील पाणी विसर्गाबाबत सूचना द्याव्यात. शहरातील पुरबाधित भागात सीसीटीव्ही यंत्रणा कायान्वित करण्यात यावी. महावितरणच्या वतीने खंडित करण्यात आलेला वीजपुरवठा पुर्वरत करावा. पुणे शहरात निर्माण झालेली पूरपरिस्थिती भविष्यात उद्भवणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी, असेही श्री. मोहोळ म्हणाले.

बैठकीस उपस्थितीत लोकप्रतिनिधींनी धरणातील पाणीसाठा, विसर्गाबाबत वेळोवेळी अद्ययावत सूचना, पुरबाधित भागातील नुकसानीचे पंचनामे करुन बाधित नागरिकांना मदत, त्यांना देण्यात येणारी नुकसान भरपाई, नदीपात्रातील भराव काढणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक दाखले उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना केल्या. डॉ. पुलकुंडवार म्हणाले, भारतीय हवामान खाते आणि कृषी विभागाच्या स्कायमेट यंत्रणेकडून येणाऱ्या पर्जन्यमानाच्या अंदाजाच्या सुक्ष्म निरीक्षणाकरीता पुणे महानगरपालिकेने एक स्वतंत्र कक्ष निर्माण करावा. जलसंपदा विभागाने धरणातील येवा तसेच धरणातून करण्यात येणारा पाण्याच्या विसर्गाबाबत जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, महसूल, महानगरपालिका, पोलीस प्रशासन, स्थानिक यंत्रणांना संदेश व दूरध्वनी, इमेलद्वारे कळवावे, त्याची नोंदही घेण्यात यावी. पुरबाधित झालेल्या भागातील नुकसानीचे पंचनामे करुन तात्काळ मदत करण्याची करावी. विशेष मदतीबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, असेही डॉ. पुलकुंडवार म्हणाले.

डॉ. दिवसे म्हणाले, पुरबाधित परिसरातील नागरिकांना मदतकार्य सुरू असून बाधित क्षेत्रातील सुमारे ४ हजार ५०० नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. त्यांना जेवण, नाश्ता, ब्लॅकेट आदी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. पुणे शहर व हवेलीचे उप विभागीय अधिकारी यांच्या मदतीने नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. पंचनामे पूर्ण होताच मदतीसाठीचे प्रस्ताव तात्काळ शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. अतिवृष्टीच्या काळात मयत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबाना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीकरीता प्रस्तावाकरीता सादर करण्यात येणार आहे. हवामान खात्याच्या अंदाजाबाबत जिल्हा प्रशासन दक्ष असून त्यानुसार जिल्ह्यात आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत, अशी माहिती डॉ. दिवसे यांनी दिली.

## सदर्न कमांड येथे कारगिल विजय दिवस साजरा

**पुणे । प्रतिनिधी**

सदर्न कमांडने २५ वा कारगिल विजय दिवस मोठ्या अभिमानाने आणि उत्साहात साजरा केला . कारगिल युद्धातील भारतीय सैन्याच्या गौरवशाली विजयाला आज २५ वर्षे पूर्ण झाली. कारगिल युद्ध हे आपल्या रक्ताने आणि सर्वोच्च बलिदानाने इतिहासात एक सुवर्ण अध्याय कोरलेल्या शूरवीरांच्या निःसंदिग्ध शौर्य आणि पराक्रमाची आठवण करून देते.

दक्षिण कमांड युद्ध स्मारक येथे आयोजित एका समारंभात लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, अति विशिष्ट सेवा पदक, जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, सदर्न कमांड, यांनी पुष्पचक्र अर्पण करून आपल्या हुतात्मा जवानांच्या अतुलनीय शौर्य आणि बलिदानाला आदरांजली वाहिली. युद्धात भारताला शानदार विजय मिळवून देणाऱ्या शूर जवानांच्या शौर्य आणि बलिदानाला अभिवादन करण्यासाठी आजी आणि माजी लष्करी अधिकारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.



कारगिल विजयाच्या स्मृतिप्रीत्यर्थ दक्षिण कमांडने गेल्या महिनाभरात विविध ठिकाणी बाईक रॅली, वृक्षारोपण, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वीरगाथा यांसह विविध कार्यक्रम आयोजित केले. ज्यामध्ये कारगिल युद्धातील माजी जवानांनी संवाद साधला. या कार्यक्रमांचा उद्देश देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत शौर्याची गाथा पोहोचवणे, आपल्या शूर जवानांचा पराक्रम साजरा करणे आणि त्यांचे स्मरण करणे हा आहे.

## कवठे येमाई येथे २ शेळ्या बिबट्याच्या हल्ल्यात ठार

शिरूरत : कवठे येमाई (ता.शिरूर) येथील टाव्हरे वस्ती येथे बिबट्याच्या हल्ल्यात दोन शेळ्या ठार व एक शेळी गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

टाव्हरे वस्ती येथील राहुल बबन सांडभोर या शेतकऱ्याच्या घरासमोर असणाऱ्या गोठ्यात बिबट्याने प्रवेश करून शेळ्यांवर हल्ला केला. शेळ्या ओरडण्याचा आवाज ऐकून सांडभोर झोपेतून जागे झाले. त्यांनी बिबट्याला पाहून आरडाओरडा केल्याने त्याने धूम ठोकली. या हल्ल्यात दोन शेळ्या ठार झाल्या असून, एक शेळी गंभीर जखमी झाली आहे. या घटनेमुळे सांडभोर यांचे ३० हजार रुपयांचे नुकसान झाले. सदर घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांच्या मार्गदर्शनानुसार वनपाल गणेश पवार, वनरक्षक नारायण राठोड, वनमजूर हनुमंत कारकूड यांनी पंचनामा केला. तालुक्याच्या पश्चिम भागातील कवठे येमाई, सविंदणे, मलठण, कान्हूर मेसाई परिसरातील गावांमध्ये बिबट्याचे पशुधनांवरील हल्ले वाढले आहे. यामुळे वनविभागाने तातडीने पिंजरा लावून बिबट्यांना जेरबंद करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## वाघोलीतील ज्वेलर्स दुकान फोडणारे जेरबंद; सराईतावर तब्बल २५ गुन्हे

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली परिसरात असलेल्या गणेश ज्वेलर्स दुकानाचे शटर उचकाटून घरफोडी करणार्या सराईत आरोपीसह दोघांना गुन्हे शाखा यूनिट सहाच्या पथकाने अटक केली. आरोपीकडून चोरीच्या दोन दुचाकी, घरफोडीसाठी लागणारे साहित्य असा ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

हंसराज उर्फ हंसु रनजितसिंग टाक (२०), सनिसिंग जितेंद्रसिंग जुनी (२२, रा. दोघेही, हडपसर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. यातील हंसराज टाक हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्यावर दरोडा, घरफोडी, शरिराविरूद्धचे तब्बल २५ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

१५ जुलै रोजी वाघोलीतील गणेश ज्वेलर्स येथे घरफोडीची घटना घडली होती. तेव्हापासून पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत होता. गुन्हे शाखा यूनिट सहाचे पथक हद्दीत गस्तीवर असतानाच गुन्ह्यातील संशयीत आरोपी हे वाघोली ते भावडी रोडवरील भैरवनाथ मंदिराजवळील मोकळ्या मैदानात थांबल्याची माहिती पोलीस नाईक नितीन मुंढे यांना मिळाली.

त्यानूसार पथकाने सापळा रचून टाक आणि जूनी या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांच्याकडील दोन दुचाकी या चोरीच्या असल्याचे समोर आले. तसेच, आरोपींनी १५ जुलै रोजी साथीदारांसह वाघोलीतील गणेश ज्वेलर्सचे शटर उचकटून घरफोडी केल्याची कबूली दिली. त्यानूसार पोलिसांनी दोघांना अटक करून लोणीकंद, येरवडा, देहूरोड पोलीस ठाण्यातील एकूण ५ गुन्हे उघडकीस आणले. गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे, सहायक आयुक्त सतीश गोवेकर, यूनिट सहाचे पोलीस निरीक्षक उल्हास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार विठ्ठल खेडकर, रमेश मेमाणे, कानिफनाथ कारखेले, नितीन मुंढे, रुषीकेश ताकवणे यांच्यासह पथकाने ही कारवाई केली.

## लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटीतर्फे 'सैनिक सन्मान'




पुणे - कारगिल विजय दिनाच्या घटनेला आज २५ वर्षे पूर्ण झाली. या दिनाचे औचित्य साधत 'लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटी'च्या वतीने सर्व शाखानिहाय परिसरातील माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला. शाल, सन्मानपत्र आणि भेटवस्तू असे सन्मानाचे स्वरूप होते. यावेळी सेनापती बापट रोडवरील विभागीय कार्यालयात यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात लोकमान्य सैनिक सन्मान गुंतवणुक योजनेचे अनावरण करण्यात आले.

याप्रसंगी ब्रिगेडियर प्रसाद जोशी (निवृत्त), कर्नल शशिकांत महाजन (निवृत्त), नायक विभाकर काटे (निवृत्त), लष्कराच्या शस्त्रास्त्र विभागाच्या पुणे येथील तांत्रिक शाखेच्या अधिकारी शुभदा कापडे व त्यांचे पती संजीव कापडे, लोकमान्य सोसायटी पुणे विभागीय प्रमुख सुशील जाधव, सहा. क्षेत्रीय प्रबंधक हर्षद झोडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

कारगिल युद्धात आपल्या प्राणांची बाजी लावून सैनिकांनी केवळ देशरक्षणच केले नाही तर आव्हानात्मक परिस्थितीतही पाकिस्तानी सैन्याला चारी मुंड्या चीत करीत विजय मिळवला. सैनिकांचे हे साहस अलौकिक आहे. असे गौरवौद्गार यावेळी बोलताना सुशील जाधव यांनी काढले.

## लवासातील बेपत्ता कामगारांचा अद्याप शोध सुरूच; रस्ते बंद झाल्याने मदत कार्यात अडथळे

मुळशी - लवासा (ता. मुळशी) येथील कोसळलेल्या व्हिलामध्ये अडकून पडलेल्या दोन कामागारांचा अद्याप शोध लागलेला नाही. कालपासून येथील व्हिला भोवतालची माती व राडारोडा काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू असूनही विविध कारणांनी मदत कार्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे तेथील दोन कामगार अद्यापही बेपत्ता आहेत.

राहुल घोरेचा (वय ४२) व मनोज चुडासामा (वय अंदाजे ६३) अशी बेपत्ता कामगारांची नावे असून दोघेही मुंबई येथील दहिसरमधील रहिवासी आहेत. परवा गुरुवार दिनांक २५ रोजी हे दोघे कामगार इलेक्ट्रीशियनची कामे करण्यासाठी लवासात आले होते. लवासातील एका व्हिलामध्ये इलेक्ट्रीकची कामे सुरू होती.

दरडीसहित व्हिला कोसळून खाली आल्याने तेव्हापासून हे दोन्हीही कामगार बेपत्ता झालेले आहेत. कोसळलेल्या व्हिलाखाली, मातीमध्ये ते दोघे अडकून पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

येथील दरडीची माती व राडारोडा दूर करून या दोघांचा शोध घेण्याचे काम चालू आहे. त्यासाठी सध्या तेथे जेसीबी व अन्य साधने आहेत. मात्र मातीचे प्रामण खूपच असल्याने ही माती तसेच अन्य राडारोडा बाजूला करायला मदतनिसांची दमछाक होत आहे. त्यामुळे कालपासून सुरू केलेले मदत कार्य अद्यापही पूर्ण होऊ शकलेले नाही. त्यात तेथील भागात अद्यापही पावसाची जोरदार हजेरी चालूच आहे. त्यामुळे माती दूर करण्यासाठी गेलेल्या व्यक्ती तेथील मातीत अडकून पडत आहेत. लवासात जाण्यासाठी दोनच मुख्य व रस्ते सुलभ आहेत. त्यापैकी एक रस्ता पानशेत





मार्गे वरसगाव-आडमाळ व लवासा असा आहे. तर दुसरा रस्ता पिरंगुट-मुठा-टेमघर असा आहे. सध्या टेमघर येथील रस्ता खचल्याने बंद ठेवला आहे. तर पानशेतमार्गे असलेला रस्ताही पडळघर या ठिकाणी कालच्या पावसात पूर्ण वाहून गेला आहे.

बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी माती व राडारोडा बाजूला करायला जेसीबी अपुरी पडत आहे. त्या ठिकाणी पोकलेनची अत्यंत गरज आहे. मात्र सध्या दोन्हीही रस्ते बंद असल्याने तेथे पोकलेन जाऊच शकत नाही. त्यामुळे मदत कार्यात मोठा अडथळा झाला आहे. अस्मानी संकटामुळे प्रशासनापुढे मोठेच संकट उभे राहिलेले आहे

## लवासा सिटीकडे जाणारा मुख्य रस्ता टेमघर घाटात खचला

मुळशी : लवासा सीटीकडे जाणार मुख्य रस्ता टेमघर ( ता. मुळशी) येथील घाटात खचला आहे. या परिसरामध्ये सलग चार ते पाच दिवस जोरदार पाऊस पडल्यामुळे या रस्त्या खचला आहे. मुसळधार पावसामुळे रस्त्याच्या एका कडेच्या आतील भाग वाहून जाऊन, अर्ध्यापेक्षा जास्त रस्ता खचला आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे तडे गेले आहेत. त्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी बंद केला आहे.



मुळशी सार्वजनिक बांधकाम विभाग व स्थानिक प्रशासनाने पर्याय रस्त्याचे काम चालू आहे. परंतु पुढील १२ ते १५ तासासाठी हा रस्ता बंद राहणार आहे. या परिसरामध्ये पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे पर्यायी रस्ता करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने सार्वजनिक बांधकाम विभाग या ठिकाणी काम करीत आहेत.

अचानक झालेल्या पावसामुळे हा रस्ता खचल्यामुळे लवासाकडे जाणारी वाहतूक व लवासाकडून पुण्याकडे येणारी वाहतूक बंद झाल्यामुळे अनेक रहिवासी व काही फिरायला आलेले पर्यटक लवासामध्ये अडकून पडले आहेत. पुढील काही दिवसांसाठी हा रस्ता बंद असणार आहे. त्यामुळे लवासा सिटीकडे पर्यटकांनी येऊ नये असे आवाहन तहसीलदार रणजित भोसले यांनी केले आहे.

## पावसामुळे विद्यापीठाच्या परीक्षा ढकलल्या पुढे, नवीन वेळापत्रक होणार जाहीर

अतिवृष्टीमुळे महाविद्यालयांना २ दिवस सुट्टी जाहीर करण्यात (आल्या होत्या. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशालेच्या शुक्रवारी (दि. २६) आणि शनिवारी (दि.२७) होणारी परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या दोन दिवसीय परीक्षेचे पुन्हा नियोजन करून वेळापत्रक लवकरच विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिली आहे. विद्यापीठाच्या उर्वरित परीक्षा या नियोजित वेळापत्रकानुसार होतील याची कृपया विद्यार्थी, पालकांनी नोंद घ्यावी. याबाबत काही शंका असल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्रतिनिधी यांनी तत्काळ परीक्षा विभागाशी संपर्क साधावा. सर्व संलग्नित परीक्षा केंद्राचे प्राचार्य, समन्वयक आणि महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांनी या सूचनेची नोंद घेऊन आपल्या स्तरावरून सर्व संबंधित विद्यार्थ्यांना सूचना द्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने केले आहे.

## पुण्याला 'झिका'चा धोका कायम; २ दिवसांत ५ नवीन रुग्णांची नोंद

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात झिकाचे ४४ रूग्ण आढळले असून यात पुणे शहरातील सर्वाधिक म्हणजे ३८ रुग्ण आहेत. पुण्यात गेल्या दोन दिवसांत पाच नवीन रूग्णांची नोंद झाली आहे. झिकाचा धोका गर्भवती महिलांना होण्याच्या शक्यतेने आरोग्य विभागाकडून गर्भवती महिलांचे सर्वेक्षण तपासणी करण्यात येत आहेत.

गेल्या पंधरा दिवसांपासून राज्यातील झिका रूग्णांची संख्या वाढतच चालली आहे. पुणे शहरात ३८ , पुणे ग्रामीण २, कोल्हापूर १, तर अहमदनगर संगमनेर मध्ये ३ असे एकूण ४४ रुग्णांची नोंद करण्यात आली. कोल्हापूर, पुणे आणि अहमदनगर अशा ठिकाणी त्वरीत ट्रॅकिंग आणि ट्रेसिंग कामाची सुरुवात करण्यात आली आहे. झिका रुग्ण आढळलेल्या कोल्हापूर शहरात ४०, अहमदनगरमध्ये ९४, पुणे शहरात ४११, पुरंदरमध्ये १५२ आणि मुळशीत ६२ गर्भवती महिलांचे नमुने घेतले आहेत. त्यात १५ गर्भवती महिलांना झिकाची लागण झाल्याचे दिसून आले. यात पुणे शहरात १३ गर्भवती महिला असून अहमदनगरमध्ये दोन महिला




आहेत. जलद ताप सर्वेक्षण मोहीम रुग्णाच्या ३.५ किमी भागात सर्वेक्षण करुन रक्तजल नमुने संकलन, गर्भवती महिलांचे रक्तजल नमुन्यांचे संकलन व तपासणी, सर्व रुग्णांना लक्षणांवर आधारीत उपचार तसेच गर्भवती महिलांना आजारातील धोक्यांवर मार्गदर्शन प्रतिबंधात्मक उपाययोजनेतून देण्यात आले. तसेच एडिस डासांच्या प्रतिबंधासाठी प्रभावी शास्त्रीय उपाययोजना केल्या जात असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

## पुणेकरांवर भयानक संकट, 'कपडे आणि ब्लँकेटची मदत करा'; सुप्रिया सुळे यांचं कळकळीचं आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील सिंहगड रोडवर असणाऱ्या अनेक सोसायटींमध्ये वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांवर मोठं संकट कोसळलं आहे. अतिवृष्टीमुळे शेकडो नागरिकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. शेकडो वाहनांचं नुकसान झालं आहे. लाखो रुपयांचं नुकसान झालं आहे. त्यामुळे अनेक महिलांनी हंबरडा फोडला आहे. या परिसरात अद्यापही वीज सुरु झालेली नाही. याशिवाय सोसायट्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांमध्ये गाळ भरला आहे. त्या अद्यापही स्वच्छ झालेल्या नाहीत. त्यामुळे नागरीक खूप हतबल आहेत. या नागरिकांच्या घरातील सर्व



सामानाचं नुकसान झालं आहे. त्यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांनी पुण्यातील इतर नागरिकांना नुकसानग्रस्त भागातील नागरिकांना मदतीचं आवाहन केलं आहे. सुप्रिया सुळे यांनी आज नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी याबाबतचं आवाहन केलं. तसेच त्यांनी राज्य सरकारवरही निशाणा साधला.

आता राजकारण करायचं नाही, आपली लोकं अडचणीत आहेत, लोकांबरोबर पूर्ण ताकदीने त्यांच्या मदतीसाठी उभं राहिलो आहोत. राजकारणासाठी खूप वेळ आहे. कालच जेव्हा ही बातमी आली तेव्हा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासोबत माझी सविस्तर चर्चा झाली. त्यांनीदेखील जे स्टेटमेंट केलं ते मी पाहिलं. महापालिका आणि जलसंपदा विभाग यांच्यात समन्वय नसल्याने पुन्हा एकदा स्थानिकांवर संकट आलं आहे. या संकटामुळे लोकांचं आयुष्य उद्ध्वस्त झालं आहे. महिला रडत आहेत. मुलांच्या परीक्षा असतील, मुलांचे कागदपत्रे असतील, आताच एक महिला मला सांगत होती की, तिने कर्ज काढून फर्निचर केलं होतं. पण सारं उद्ध्वस्त झालं. याला जबाबदार कोण? अर्थातच हे महाराष्ट्राचं सरकार, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

माझी या महाराष्ट्राच्या सरकारला विनंती आहे की, थोडावेळ राजकारण, घरफोडी, पक्षफोडी बाजूला ठेवा. माणुसकी दाखवा. हे सरकार अतिशय असंवेदनशील आहे. माझी मागणी आहे की, या संपूर्ण भागातील नागरिकांसाठी एक वेगळं पॅकेजची घोषणा व्हावी. पाण्याच्या टाक्या तातडीने साफ झाल्या पाहिजेत. दिवसातून दोन ते तीन वेळा फवारणी झाली पाहिजे. स्वच्छ पाणी आणि वीजेची सोय ही सर्वात आधी झाली पाहिजे. यानंतर प्रत्येकाला आर्थिक मदत झाली पाहिजे. प्रत्येकाला एक महिन्याच्या धान्याचा पुरवठा झाला पाहिजे, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली.

सुप्रिया सुळे यांची कळकळीची विनंती

मी पुणेकरांना विनम्र विनंती करते, आपण आपल्या परीने कपडे, ब्लँकेट अशी काहीतरी मदत करूयात. माझी कलेक्टर आणि पालिका आयुक्तांना विनंती आहे की, तुम्ही सुद्धा लोकांकडे अपील करा. मी अपील करते. आम्ही तर सुरु केलेलंच आहे. तुम्ही कपडे किंवा धान्य आम्हाला मदतीसाठी दिलं तर आम्ही प्रामाणिकपणे ती मदत नुकसानग्रस्तांपर्यंत पोहोचवू, असं आवाहन सुप्रिया सुळे यांनी केलं.

शेवटच्या माणसापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याची जबाबदारी आमची असेल. त्याचबरोबर सरकार हे पूर्णपणे अपयशी ठरलेलं आहे. युद्ध पातळीवर काम चाललं पाहिजे. पुढच्या आठ दिवसांत वेगळा कॅम्प या ठिकाणी लावला जाईल. मुलांची सर्व कागदपत्रे बनवले जातील. आम्ही अन्नधान्यासाठी सर्वच काम करतोय. रात्रीही काल जेवण, पाणी पोहोचवण्यासाठी आमचे सर्व सहकारी काम करत आहेत. हे परत होता कामा नये यासाठी काळजी घेणं गरजेचं आहे, अशी भावना सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

## पूरग्रस्त नागरिकांच्या घरातील गाळ, चिखल युद्धपातळीवर दूर करा - मुख्यमंत्री शिंदे

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर आणि परिसरात गुरुवारी अतिवृष्टीमुळे सिंहगड रोड, संचयनी पुलाजवळील पाटील इस्टेट, एकता नगर, फुलपची वाडी आदी भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने चिखल आणि घाणीचे साम्राज्य पसरले आहे. या परिसरात राहात असलेल्या नागरिकांच्या घरांमधील चिखल, गाळ आणि कचरा युद्धपातळीवर दूर करावा, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

महापालिका तसेच साफसफाई करणाऱ्या खासगी कंपन्याच्या मदतीने युद्धपातळीवर स्वच्छता मोहिम राबवावी, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. पुरामुळे घरांचे, शेतीचे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



पुण्यातील ज्या भागात पुराचा फटका बसला, तेथे अस्वच्छेतमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, याची मुख्यमंत्र्यांनी तातडीने दखल घेत प्रशासनाला हे आदेश दिले आहेत. जिल्हा प्रशासनाला डीप क्लीन मोहिम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. स्वच्छता मोहीम राबवण्यासाठी सुमित इंटरप्राईजेस आणि बीव्हीजी या खासगी स्वच्छता कंपन्यांची मदत घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. सुमित कंपनी ५०० स्वच्छता कर्मचारी आणि बीव्हीजी कंपनी १०० सफाई कर्मचारी उपलब्ध करून दिले आहेत. पुराचे पाणी, चिखल यामुळे परीसरात रोगराई पसरू नये यासाठी महापालिका प्रशासनाने औषधांची फवारणी करावी असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत.